सोलापूर
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा

Solapur Tarun Bharat

छत्रपती संभाजीनगर, अहमदनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून वितरित

छत्रपती संभाजीनगर | मंगळवार, ०४ फेब्रुवारी २०२५ | वर्ष दुसरे | अंक ३१० | पाने : ८ | किंमत रु. ६/- | www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com


## जलसंधारणाच्या प्रकल्पांच्या कायमस्वरूपी दुरुस्ती-देखभालकरिता नवीन धोरण आणणार - मुख्यमंत्री

मुंबई : राज्याला दुष्काळमुक्त करण्यासाठी विविध सामाजिक संस्थांच्या माध्यमातून जलसंधारणाची चळवळ उभी करण्यात आली आहे. राज्य शासन जुने प्रकल्पांच्या कायमस्वरूपी दुरुस्ती व देखभाल करीता नवीन धोरण आणणार असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले. मृद व जलसंधारण विभाग आणि संबंधित विविध संस्था आणि संघटना यांच्यामध्ये सामंजस्य करार करण्यात आला यावेळी ते बोलत होते. यावेळी मृद व जलसंधारण राज्यमंत्री इंद्रनील नाईक, सचिव गणेश पाटील, मुख्यमंत्री कार्यालयाचे प्रधान सचिव विकास खारगे, सचिव अश्विनी भिडे, नाम फाउंडेशनचे नाना पाटेकर, मकरंद अनासपुरे, भारतीय जैन संघटनेचे शांतीलाल मुथा, टाटा मोटर्स चे प्रतिनिधी उपस्थित होते.



मुख्यमंत्र्यांनी जुने आणि अर्धवट राहिलेले जलसंधारणाचे प्रकल्प प्राधान्याने पूर्ण करण्याची योजना मांडली आहे. यामुळे कमी खर्चात अधिक काम पूर्ण होईल आणि जलसंधारणाचा प्रभावी वापर होईल. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वात जलसंधारण प्रकल्पांवर लक्ष केंद्रित करण्यात आले असून, तीन महत्त्वपूर्ण सामंजस्य करार करण्यात आले आहेत. यामध्ये नाम फाउंडेशन, टाटा मोटर्स आणि भारतीय जैन संघटनेचा सहभाग आहे.

मुख्यमंत्री श्री फडणवीस म्हणाले,नाम फाउंडेशनने शेतकऱ्यांना जलसंधारणाच्या कामामध्ये सहभाग वाढवण्यासाठी महत्त्वपूर्ण भूमिका निभावत आहे. जलसंधारणाविषयी शेतकऱ्यांमध्ये आत्मविश्वास निर्माण करणे, जनजागृती करणे आणि ग्रामीण भागाच्या जीवनमानात सुधारणा घडवून आणणे महत्वपूर्ण काम नाम फाउंडेशनच्या माध्यमातून होत आहे.

भारतीय जैन संघटनेने जलसंधारणाच्या चळवळीला प्रोत्साहन दिले असून, तलावांचे खोलीकरण, गाळ काढणे आणि अन्य महत्त्वाची जलसंधारण कामे लोकसभागातून केली जात आहेत. जलसंधारण विषयी प्रशिक्षण देवून जलतज्ञ निर्माण करण्याचे महत्त्वाचे काम या संघटनेच्या माध्यमातून होत असल्याचे मुख्यमंत्री श्री फडणवीस यांनी सांगितले. टाटा मोटर्सनेही जलसंधारणामध्ये मोठे योगदान दिले आहे, जे राज्यातील दुष्काळ दूर करण्यासाठी महत्त्वपूर्ण ठरले असेही मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले.

## महाराष्ट्रात शेती उत्पादन वाढवण्यासाठी AI वापरणार



मुंबई : शेतकऱ्यांचे उत्पादन वाढविण्याबरोबरच त्यांच्या उत्पादन खर्चात बचत करण्यासाठी राज्यात कृषी क्षेत्रात कृत्रिम बुद्धिमत्तेचा अर्थात एआयचा प्रायोगिक तत्त्वावर वापर करण्याचा विचार सुरू आहे. या प्रयोगासाठी कृषी विभागाने सहकार विभागासोबत समन्वय करून प्रकल्पाची तांत्रिक आणि आर्थिक व्यवहार्यता तपासावी, असे निर्देश राज्याचे उपमुख्यमंत्री आणि अर्थमंत्री अजित पवार यांनी प्रशासनाला दिले आहेत. राज्यातील कृषी क्षेत्रात कृत्रिम बुद्धिमत्तेचा अर्थात एआयचा वापर करण्याबाबत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रालयातील उपमुख्यमंत्री कार्यालयाच्या समिती कक्षात बैठक झाली. या बैठकीत अजित पवारांनी प्रशासनाला एआयचा प्रायोगिक तत्त्वावर वापर करण्यासाठी तांत्रिक आणि आर्थिक व्यवहार्यता तपासण्याचे निर्देश दिले.

प्रत्येक क्षेत्रात कृत्रिम बुद्धिमत्तेच्या वापरामुळे क्रांतिकारी बदल घडत आहेत. कृषी क्षेत्र सुद्धा याला अपवाद नाही. येत्या काळात बदलते हवामान, अवेळी पडणारा पाऊस, पीकांवर वारंवार होणारा रोगांचा प्रादुर्भाव, मजुरांचा तुटवडा यांवर मात करत शेतकऱ्यांचे उत्पादन वाढविण्याबरोबरच त्यांच्या उत्पादन खर्चात बचत करण्यासाठी कृषी क्षेत्रात कृत्रिम बुद्धिमत्तेला पर्याय नाही. कृषी क्षेत्रात कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर केल्यामुळे पीक आरोग्याचे विश्लेषण, मातीतील कार्बन प्रमाण शोधणे, मातीच्या आरोग्याची सविस्तर माहिती, तणाचा प्रकार ओळखणे, पूर्वीच्या उत्पन्नाची तुलना, मातीचे तापमान, वातावरणातील आर्द्रता, पिकांवरील कीड व रोगांचा प्रादुर्भाव ओळखणे, तसेच पिकांवरील जैविक-अजैविक ताण ओळखणे शक्य होणार आहे. कृत्रिम बुद्धिमत्ता तंत्रज्ञानाचा वापर केल्यास पीकांच्या उत्पादनात वाढ, मजुरी खर्चात बचत, रसायनिक खते व औषधांच्या वापरात कपात, कापणी कार्यक्षमतेत वाढ, रोगनियंत्रणाद्वारे बचत, पुरवठा साखळीतील कार्यक्षमतेत वाढ आणि एकूण खर्चात कपात होणे शक्य होईल; असे अजित पवार म्हणाले.

## डॉलरच्या तुलनेत रुपया पहिल्यांदाच ८७ वर

नवी दिल्ली : जागतिक घडामोडी विशेषतः अमेरिका आणि इतर देशांमध्ये व्यापार युद्ध सुरू आहे. परिणामी भारताचा रुपया डॉलरच्या तुलनेत ८७ रुपयांवर पोहोचला. डॉलरच्या तुलनेत रुपयाने पहिल्यांदाच हा टप्पा गाठला आहे. कोरिया, मलेशिया इंडोनेशिया आणि थायलंड या देशांच्या चलनामध्ये देखील घसरण पाहायला मिळाली.



मागील काही महिन्यात रुपयाची मोठ्या प्रमाणात पडझड सुरू आहे. रुपया ८७ रुपयांपर्यंत मार्च महिन्यापर्यंत घसरेल, असा अंदाज आर्थिक क्षेत्रातील तज्ज्ञांकडून व्यक्त केला जात होता. मात्र, फेब्रुवारीच्या पहिल्याच आठवड्यात डॉलरच्या तुलनेत रुपयानं नीचांकी पातळी गाठली आहे. शुक्रवारी डॉलरच्या तुलनेत रुपया ८६.६१ वर बंद झाला होता. मात्र, आज तब्बल ८७ प्रति डॉलरवर रुपया पोहोचला.

अमेरिकेच्या सुधारीत आर्थिक परिस्थितीत अमेरिकन डॉलरला मजबुती मिळाली आहे. भारतासारख्या उदयोन्मुख बाजारपेठांच्या तुलनेत अमेरिकेतील उच्च उत्पन्नामुळे गुंतवणूकदारांसाठी अमेरिका आकर्षक ठरत आहे.

## महायुती सरकार लघु उद्योजकांना प्राधान्य देईल : अतुल सावे

छत्रपती संभाजीनगर : महायुतीचे सरकार लघुउद्योजकांना नक्कीच प्राधान्य देईल व त्यांना उद्योग करणे सोपे होईल असे आश्वासन महाराष्ट्र राज्याचे मा. मंत्री अतुल सावे ( इतर मागासवर्गीय बहुजन कल्याण, दुग्ध विकास व अपरंपारिक ऊर्जा विकास ) यांनी लघुउद्योग भारतीच्या मराठवाडा अधिवेशनात दिले. तसेच लघुउद्योजकांच्या समस्या सोडवण्यासाठी महाराष्ट्राचे मुख्यमंत्री माननीय श्री देवेंद्रजी फडणीस हे खूप आग्रही आहेत व त्यांनी आपला कारभार जोमाने करण्यास सुरुवात केली आहे. असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.

लघु उद्योग भारतीचे मराठवाडा अधिवेशन काल छत्रपती संभाजीनगर येथे संपन्न झाले. मराठवाडा आटो क्लस्टर येथे संपन्न झालेल्या या अधिवेशनात उद्घाटन प्रसंगी ते बोलत होते.

व्यासपीठावर लघुउद्योग भारती चे अखिल भारतीय अध्यक्ष श्री घनश्यामजी ओझा उपाध्यक्ष श्री रवींद्र सोनवणे महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष रवींद्र वैद्य तसेच श्री किशोर शितोळे अमित घैसास मिलिंद पोहनेरकर उदय गिरधारी राजेश कामड, सुहास देशपांडे यांची उपस्थिती होती

लघुउद्योग भारती महाराष्ट्र प्रदेशाचे अध्यक्ष श्री रविंद्र वैद्य यांनी लघुउद्योजकांच्या समस्या मांडल्या यामध्ये एमआयडीसी बाहेरील उद्योगांच्या एन ए प्रश्न, माथाडी कामगार कायदा हटवणे,स्वस्त व अखंडित वीज पुरवठा,छोटे भूखंड मिळणे आधी समस्या मांडल्या. याप्रसंगी लघुउद्योग भारती अखिल भारतीय अध्यक्ष श्री घनश्यामजी ओझा यांनी केंद्र सरकार लघुउद्योजकांच्या पाठीशी आहे व वेळोवेळी सरकार लघुउद्योगभारतीशी चर्चा करत असते व आजच्या अर्थसंकल्पात आपण त्याचा परिणाम बघत आहोत. उद्योजकांनी आयात वस्तूंना पर्याय निर्माण करणे गरजेचे आहे. असेही त्यांनी आवाहन केले.या अधिवेशनात पर्यावरण संरक्षण,सदस्यता अभियान,मराठवाड्यातील उद्योजकांच्या संधी, निर्यात संधी, लीन मॅन्युफॅक्चरिंग आदी विषयांवर श्री किशोर शितोळे, मुकुंद कुलकर्णी सुनील रायथत्ता, प्रशांत करवा निशांत होनमुटे व देवेन वाईकर यांनी मार्गदर्शन केले

लघु उद्योग भारती संभाजीनगरचे अध्यक्ष श्री संतोष कुलकर्णी यांनी सूत्रसंचालन केले तर श्री सुहास देशपांडे यांनी आभार प्रदर्शन केले अधिवेशनात मराठवाड्यातल्या विविध जिल्ह्यातून सुमारे १०० लघुउद्योजक उपस्थित होते.

## भारताला मोठा झटका, फोर्ब्सच्या शक्तीशाली देशांच्या यादीतून भारत टॉप १०मधून बाहेर

नवी दिल्ली: फोर्ब्सने २०२५मध्ये जगातील १० सर्वात शक्तीशाली देशांची रँकिंग जाहीर केली आहे. यात भारताला टॉप १०मधून बाहेर ठेवण्यात आले आहे. ही यादी अनेक बाबतीत महत्त्वाची आहे कारण भारतासारख्या विशाल जनसंख्या, चौथे सर्वात मोठे सैन्य आणि पाचवी सगळ्यात मोठी अर्थव्यवस्था असलेल्या देशाला टॉप १०मधून बाहेर ठेवण्याबाबत मोठे सवाल उपस्थित केले जात आहेत.

फोर्ब्सने सांगितले की ही यादी यूएस न्यूजकडून तयार करण्यात आली आहे आणि रँकिंगसाठी पाच मुख्य बाबींचा वापर केला गेला आहे. या यादीला कोणत्याही देशातील नेते, आर्थिक प्रभाव, राजकीय प्रभाव, मजबूत आंतरराष्ट्रीय संघटन आणि मजबूत सैन्याच्या आधारावर ठरवले जाते. या यादीत पहिल्या स्थानावर अमेरिका आहे. अमेरिकेचा जीडीपी ३०.३४ ट्रिलियन डॉलर असून लोकसंख्या ३४.५ कोटी आहे. त्यानंतर चीनचा नंबर लागतो. चीनचा जीडीपी १९.५३ ट्रिलियन डॉलर आहे. त्यांची लोकसंख्या १४१.९ कोटी आहे. रशिया तिसऱ्या स्थानावर आहे. त्यांचा जीडीपी २.२ ट्रिलियन डॉलर आहे. तर लोकसंख्या १४.४ कोटी आहे. चौथ्या स्थानावर युके आहे. त्यांचा जीडीपी ३.७३ ट्रिलियन डॉलर आहे.





72198 21111 | BAJAJ SECURE • AMC • ROAD SIDE ASSISTANCE

अटी व शर्ती लागू. *एका विशिष्ट पल्सर मॉडेलची प्रारंभिक किमत आहे. बजाज ऑटोला कोणत्याही ऑफर व किमती कोणत्याही पूर्वसूचनेशिवाय मागे घेण्याचा/बदलण्याचा अधिकार आहे, ज्या मॉडेल व राज्यांमध्येच बदलू शकतात. AMC निवडक मॉडेल्स व विशिष्ट राज्यांमध्येच उपलब्ध आहे. अधिक माहितीसाठी, कृपया आपल्या जवळच्या बजाज डीलरशी संपर्क साधा. रोडसाइड सहाय्य थर्ड पार्टी सर्व्हिस प्रोव्हायडर्स द्वारे दिले जाते व त्यांच्या अटी व शर्ती लागू होतात. इ-कॉमर्स प्लॅटफॉर्मवरील ऑफर्स त्यांच्या स्वतःच्या अटी व शर्तींवर आधारित असतात.

**Authorised Dealers For Bajaj Auto Ltd.: Aurangabad • Adalat Road** PAGARIYA BAJAJ 02406659937 • **AkashPusad** PAGARIYA BAJAJ 7709366111 • **Harsul Point** PAGARIYA BAJAJ 7709366111 • **Waluj** PAGARIYA BAJAJ 6616734 **Bhokardan Road Sillod** ASHOK BAJAJ 8380001965 • **Shendra** ASHOK BAJAJ 8380025694 • **Buldhana** ASHOK BAJAJ • **Jamkhed** Navale Bajaj 9130609999, 8929643158• **Jalna** AMBRISH BAJAJ 8605466906• **Ahmednagar Kinetic Chowk** Chhatrapati Bajaj 9175142881, • **Ahmednagar Savedi Naka** Chhatrapati Bajaj 8087203861 • **Kopargaon** Shirode Bajaj 9921009952, • **Rahuri** Shirode Bajaj 9921009953 • **Shrirampur** Shirode Bajaj 9270468998 • **Sangamner** MALPANI BAJAJ 9850112036, 02425-2225031. **Authorised Service Centre: Paithan** 9850823363, **Bidkin** 9881341213, **Vaijapur** 9422854982, **Lasur 7276183895**, **Gangapur 9423940806**, **Shivoor** 9850709785, **Mahalgaon 9284755116**, **Soygaon** 8956111154, **Phulambri** 7588075675, **Karmad** 9881159432, , **Pishore** 9130646246 **Bhokardan** 9923485831, **Georai** 8698568509, **Majalgaon** 9422380842, **Kaij** 9423715751, **Ambajogai** 9607091874, **Patoda** 9423471895, **Ashti** 7840900444, **Ambad** 9834910719, **Rajur** 8275333360, ,**Walsawangi** 8275855491, **Partur** 9112649438 , **Ausa** 8149542017 **Murud** 9860351229, **Chakur** 9049746161, **Renapur** 9881951011, **Omerga** 9890521818, **Paranda** 9421212280, **Kallamb** 8329268718, **Kinwat** 9527257525, **Mukhed** 9579194868 , Umri 8149815921, Narsi 9860069635 **Bhokar** 9423139732, **Mahur** 96089073034 ,**Malegaon** 9403746580,**Vasmat** 9890173708, **Sengaon** 9762427999, **Jawala Bazar** 9890989138, **Pathri** 9860907003, **Palam** 9763385151, **Selu** 7499441540, **Gangakhed** 9421859114, **Ranisawargaon** 8668727630. **Khamgaon** 9921479013, **Rashin** 9975704778, **Mirajgaon** 7774826060 **Akole** 9881939099, **Alephata** 7507571715, **Ashwi** 8888201059, **Ghargaon** 9970302801,**Manchar** 9890014697, **Narayangaon** 9850112036, **Sakur** 9422146709, **Talegaon Dighe** 9970886986, **Nighoj** 9850224992, **Kotul** 9921583946, **Ottur** 8007000790, **Shevgaon** 9067893709, **Loni** 7709387085, **Ghodegaon** 7588030777, **Sonai** 7588603005, **Newasa** 9527554555, **Kukana** 7588079959, **Rahata** 9881239140.

सोलापूर तरुण भारत

www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# खा.सोनवणेंनी काढले रेल्वे मार्गातील प्रलंबित 'गतिरोधक' अन् रेल्वेने धरली 'स्पीड'

# ४ व ५ फेब्रुवारीला बीड पर्यंत जलदगती चाचणी

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.३ फेब्रुवारी**

सन १९९५ ला अहिल्यानंतर-परळी रेल्वे मार्गाला मंजुरी मिळाली. काम सुरु झाले मात्र त्या कामासाठी म्हणावा तसा पाठपुरावा न झाल्याने काम रखडत गेले. २८/२९ वर्षात रेल्वेचे काम अंमळनेर पर्यंतच येऊन थांबले होते. २०२४ च्या लोकसभा निवडणुकीत विजयी झाल्यानंतर खा.बजरंग सोनवणे यांनी पहिलीच बैठक रेल्वे विभागाची घेतली. कामास गती देण्यासाठी येत असलेल्या अडथळ्यांची माहिती घेतली. कामास गती देण्यासाठी रेल्वेमंत्री व रेल बोर्डाचे चेअरमन यांची वारंवार भेट घेऊन रेल्वे कामाला गती देण्याचे काम केले. पालवन परिसरात जमीनीच्या मावेजाची थकित राहिलेली प्रकरणे मार्गी लावत रेल्वे कामाला गती दिली. आता दि.४ व ५ फेब्रुवारी रोजी नवगण राजुरी ते बीड लोहमार्गावर जलदगती रेल्वेची चाचणी होत आहे.

बीडला रेल्वे आलीच पाहिजे, ही घोषणा बीडकर कायम देत. त्यासाठी केवळ घोषणा दिल्या नाही तर रस्त्यावर लढा दिला. वेळप्रसंगी पोलीसांच्या काठ्या खाल्ल्या आणि जेलही भोगले. याच संघर्षातून सन १९९५ मध्ये अहिल्यानगर ते परळी रेल्वे मार्गाला मंजूरी मिळाली. पुढे अनेक वर्षे बीड रेल्वे केवळ मंजूरीच्या स्थितीत होती. मागील काही वर्षात चार दोन वर्षात पाच दहा किलोमिटरने रेल्वेचे काम पुढे सरकत होते. मागील कालावधीत ही रेल्वे अंमळनेर पर्यंत येऊन थांबली होती. रेल्वे मार्गातील भुसंपादन आणि मावेजाचे अनेक विषय प्रलंबित होते.लोकसभा निवडणूकी मधे खा.बजरंग सोनवणे यांनी विजयी झाल्यानंतर पहिली बैठक रेल्वेची घेत, रेल्वे ही बीडकरांचे स्वप्न आहे ते पुर्ण करण्यासाठी रात्रंदिवस यंत्रणा राबविण्याच्या सुचना दिला. केवळ सुचना देऊन न थांबता भुसंपादन आणि मावेजाचे प्रकरणे मार्गी लावण्यासाठी सातत्याने पाठपुरावा केला. अवध्या सहा ते सात महिन्यात आता अंमळनेर ते बीड असा रेल्वेचा प्रवास सुरू आहे. दि.३०-३१ डिसेंबर रोजी विघनवाडी ते नवगन राजुरी या नवीन लोहमार्गाची चाचणी घेण्यात आली. पहिल्या बैठकीतच दि.२६ जानेवारीपर्यंत बीडला रेल्वे येईल, असे सांगितले होते. परंतु पालवन परिसरात दोन शेतकऱ्यांचे मावेजाचे प्रकरण प्रलंबित होते. सदरील शेतकऱ्यांना मावेजा मिळून त्या जागेचा ताबा मिळावा, यासाठी खा.सोनवणे यांनी प्रयत्न केले. यानंतर आता रेल्वेमार्गातील भुसंपादनाचा गतिरोधक निघालेला असून दिलेल्या मुदतीपेक्षा दहा दिवसात रेल्वे बीडला येत आहे.

दि.४ व ५ रोजी सकाळी १० ते संध्याकाळी ६ वाजेपर्यंत आहिल्यानगर-बीड-परळी रेल्वेच्या कामातील विघनवाडी (ता.शिरुर) ते नवगण राजुरी (ता.बीड) व नवगण राजुरी ते बीड या पूर्ण झालेल्या लोहमार्गावर निरीक्षण व जलदगती चाचणी होणार आहे. त्यामुळे या परिसरातील नागरिकांनी रेल्वे मार्गापासून दूर रहावे, गुरे व पाळीव प्राणी रुळावर येणार नाहीत याची दक्षता घ्यावी. परिसरातील नागरिकांनी सूचनांचे पालन करुन सहकार्य करावे.

- खा.बजरंग सोनवणे, बीड.

## संक्षिप्त वृत्त

### परशुराम हिंदू सेवा संघ महाराष्ट्र जिल्हाध्यक्षपदी अ‍ॅड.अरविंद पाटील

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.३ फेब्रुवारी**

सर्व हिंदू समाजाला एकत्रित ठेवण्याचे कार्य करण्यासाठी परशुराम हिंदू सेवा संघ बीड जिल्हा अध्यक्षपदी बीड येथील सुप्रसिध्द अँड.अरविंद पाटील यांची नियुक्ती करण्यात आली.



माजलगाव येथे भावसार सभागृह येथे सर्व हिंदू समाज बांधवांचा मेळावा दि.२ फेब्रुवारी २०२५ रोजी आयोजित करण्यात आला होता.दूषित झालेला समाज म्हणाला एकत्रित करण्याचे काम तसेच जातीपातीला थारा न देता सर्व समाज बांधवांना एकाच कार्यक्षेत्रामध्ये काय आणण्याचे काम आपल्याला समाजामध्ये मोठ्या प्रमाणात करावे लागणार आहे त्यासाठी महाराष्ट्र राज्य पातळीवर सर्व हिंदू समाजाला एकत्रित करण्यासाठी विविध शासन योजने मध्ये सहकार्य करण्यासाठी तसेच त्यांच्या अडअडचणीला मदत करण्यासाठी परशुराम सेवा संघाचे संस्थापक अध्यक्ष अँड. विश्वजीतजी देशपांडे साहेब यांनी संघटनेची स्थापना केली.संघटनेचे कार्य गाव पातळीवर नेण्यासाठी जिल्हास्तरीय व तालुकास्तरीय संघटनेच्या विविध पदाधिकारी पदाधिकाऱ्यांशी नेमणूक अँड.विश्वजितजी देशपांडे साहेब यांच्या हस्ते करण्यात आली.या वेळी महाराष्ट्र सरचिटणीस पदी डॉ.प्रशांत पाटील .तसेच विनायक रत्नपारखी यांची तर बीड जिल्हा उपाध्यक्ष अँड शिवाजी नागरगोजे सरचिटणीस अँड एकनाथजी काकडे कोषाध्यक्ष पदी गोपाळ सर्वज्ञ यांच्या सह विविध जिल्हा व तालुका स्तरीय पदाधिकाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली.या कार्यक्रमास राज्य कार्याध्यक्ष उपेंद्रजी दवे साहेब ,कुलकर्णी साहेब सह मोठ्या प्रमाणात नागरिक व महिला प्रतिनिधी उपस्थित होते.



### माजी खा.प्रितमताई मुंडे यांच्या उपस्थितीत बीड येथे गुरुवारी घरेलु कामगार महिलांचा स्नेह मेळावा


**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.३ फेब्रुवारी**

भाजप प्रदेश उपाध्यक्ष तथा मा.खा.प्रितमताई मुंडे यांच्या प्रमुख उपस्थितीत बीड येथे गुरुवार दि ६ फेब्रुवारी सायंकाळी ४ वा गोल्डन चॉईस हॉटेल बार्शी रोड येथे घरेलु कामगार महिलांचा स्नेह मेळावा आयोजित केला असल्याची माहिती भाजच कामगार मोर्चाचे प्रदेश सरचिटणीस दादासाहेब नन्नवरे व ओमप्रकाश गिरी जिल्हा अध्यक्ष भाजपा कामगार मोर्चा जिल्हा अध्यक्ष यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे दिली आहे.

प्रसिद्धी पत्रकात म्हटले आहे की बीड तालुक्यातील घरेलु कामगार महिलांना या मेळाव्यात कामगार नोंदणी प्रमाणपत्राचे वाटप भाजप प्रदेश उपाध्यक्ष मा.खा.प्रितमताई मुंडे,भाजप भाजप प्रदेश सचिव मराठवाडा सदस्य नोंदणी प्रमुख श्री किरण पाटील जिल्हाध्यक्ष शंकर देशमुख यांचे हस्ते वाटप करण्यात येणार असून या नोंदणी प्रमाणपत्र मुळे या महिलांना शासनाच्या विविध योजनांचा लाभ होणार आहे गुरुवार दि ६ फेब्रुवारी रोजी हॉटेल गोल्डन चॉईस बार्शी रोड येथे होणाऱ्या या महिला मेळाव्याला मा.खा.प्रितमताई मुंडे भाजप प्रदेश सचिव तथा मराठवाडा नोंदणी प्रमुख श्री किरण पाटील बीड भाजप जिल्हाध्यक्ष शंकर देशमुख सरचिटणीस ड.सर्जेराव तांदळे बीड जिल्हा बँक अध्यक्ष अदित्यजी सारडा,अशोकजी लोढा जिल्हा परीषद सदस्य,बीड जिल्हा सदस्य नोंदणी प्रमुख नवनाथ शिराळे, उषाताई मुंडे बीड जिल्हा अध्यक्ष महिला मोर्चा उपस्थित राहणार असून या वेळी मकरसंक्रांती निमित्त स्नेहमिलन व तिळगुळ समारंभ संपन्न होणार आहे त्याच प्रमाणे भारतीय जनता पार्टी सदस्य नोंदणी अभियान होईल बीड तालुक्यातील महिलांनी मोठ्या प्रमाणात उपस्थिती राहण्याचे आवाहन श्री.दादासाहेब नन्नवरे यांनी केले आहे.

## स्वा.सावरकर महाविद्यालयात भारतरत्न नानाजी देशमुख यांच्या कार्यावर राष्ट्रीय परिषदेचे आयोजन

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.३ फेब्रुवारी**



भारतीय शिक्षण प्रसारक संस्था संचलित स्वा.सावरकर महाविद्यालयामध्ये १३ आणि १४ फेब्रुवारी २०२५ रोजी भारतरत्न स्वर्गीय नानाजी देशमुख यांच्या ग्रामीण विकासाच्या कार्यावर प्रकाश टाकणाऱ्या भारतरत्न नानाजी देशमुख नआर्किटेक ऑफ रुरल डेव्हलपमेंट इन इंडिया या विषयावर राष्ट्रीय परिषदेचे आयोजन करण्यात आले असल्याची माहिती महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सुहास मोराळे यांनी दिली. सावरकर महाविद्यालयामध्ये येत्या १३ आणि १४ फेब्रुवारी २०२५ रोजी भारतरत्न नानाजी देशमुख अँन आर्किटेक ऑफ रुरल डेव्हलपमेंट इन इंडिया या विषयावर राष्ट्रीय परिषदेचे आयोजन करण्यात आले आहे. या दोन दिवसीय राष्ट्रीय परिषदेमध्ये नानाजी देशमुख यांनी केलेल्या ग्रामीण विकासाच्या कार्यावर प्रकाश टाकण्यात येणार आहे. उद्घाटक म्हणून डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. विजय फुलारी हे उपस्थित राहणार आहेत. परिषदेसाठी संपूर्ण भारतातून स्वर्गीय नानाजींच्या जीवन कार्याचा अभ्यास असनारे तज्ञ मार्गदर्शक, भारतीय शिक्षण प्रसारक संस्थेचे अध्यक्ष डॉ. सुरेंद्र आलूरकर, कार्यवाह डॉ. हेमंत वैद्य, दीनदयाळ शोध संस्थांन संचालक डॉ. उपेंद्र कुलकर्णी, अभयजी महाजन, केंद्रीय कार्यकारणी सदस्य प्रवीण सरदेशमुख, कोषाध्यक्ष सत्यनारायणजी लोहिया, संस्थेचे मुख्य प्रशासकीय अधिकारी प्रा. चंद्रकांत मुळे, सावरकर संकुलाचे अध्यक्ष डॉ. पि.के. कुलकर्णी, कार्यवाह डॉ. अविनाश देशपांडे, केंद्रीय पदाधिकारी, स्थानिक पदाधिकारी येणार आहेत. भारतरत्न स्वर्गीय नानाजी देशमुख यांनी ग्रामीण विकास, शेती,आरोग्य आणि शिक्षण या विषयावर मोठे कार्य केलेले आहे, त्यांच्या कार्याचा अभ्यास करून भविष्यात येणाऱ्या पिढीला यातून प्रेरणा मिळावी, हा या परिषदेच्या आयोजनाच्या पाठीमागचा हेतू आहे. या परिषदेमध्ये सहभाग नोंदवावा असे आवाहन प्राचार्य डॉ. सुहास मोराळे, परिषदेचे समन्वयक डॉ. उत्तम साळवे, उपप्राचार्य डॉ. लक्ष्मीकांत बाहेगव्हाणकर, डॉ. कृष्णा बारटक्के, डॉ. देविदास नागरगोजे, डॉ. हंसराज जोशी डॉ. सचिन कंदले, प्रा.अनंत देशपांडे, विनोद देशपांडे यांनी केले आहे.

## नेहा काळे अबॅकस क्लासेसच्या विद्यार्थ्यांचे देश पातळीवर घवघवीत यश

**तभा वृत्तसेवा**
**माजलगाव दि.३ फेब्रुवारी**

छत्रपती संभाजी नगर या ठिकाणी शनिवारी घेण्यात आलेल्या देशपातळीवरच्या अबॅकस स्पर्धेमध्ये माजलगाव येथील नेहा काळे अबॅकस क्लासेसच्या विद्यार्थ्यांनी घवघवीत यश मिळवले आहे. या स्पर्धेमध्ये देशभरातून हजारो विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला होता. क्लासेसचे एकूण २४ विद्यार्थी स्पर्धेला बसले होते. स्पर्धा ही ऑनलाईन व ऑफलाइन या दोन्ही पद्धतीने घेण्यात आली. सात मिनिटांमध्ये १०० गणिते सोडवण्याचे कौशल्य विद्यार्थ्यांनी पूर्ण केले. ही स्पर्धा G.Champ अबॅकस या संस्थेमार्फत घेण्यात आली.



विभागीय क्रीडा संकुल छत्रपती संभाजी नगर या ठिकाणी संस्थेचे कार्यकारी संचालक श्री योगेश देशमाने व सौ.आरती देशमाने यांनी स्पर्धा आयोजित केली होती. अतिशय उत्साहामध्ये ही स्पर्धा पार पडली.या स्पर्धेमध्ये माजलगाव येथील नेहा काळे अबॅकस अकॅडमी चे चिरंजीव दिव्यम वसंत टाकणखार, कुमारी अद्विका नितीन गायसमुद्रे, कुमारी आराध्या परमेश्वर कुटे ,कुमारी श्रावणी दत्तात्रय देशमुख हे विद्यार्थी सुपरस्टार झाले. चिरंजीव मयंक प्रशांत जाधव, कुमारी सृष्टी मिनीनाथ नखाते , वेदांत गणेश कोळपकर कुमारी वेदिका गणेश कोळपकर हे विद्यार्थी फर्स्ट रँक ने उत्तीर्ण झाले. कुमारी जीवा पांडुरंग घाटूळ, चिरंजीव धनराज जयंत मगर, कुमारी प्रीती रमेश शिंदे, चिरंजीव संग्राम नितीन गायसमुद्रे, चिरंजीव रणवीर अमोल गायसमुद्रे या विद्यार्थ्यांना सेकंड रँक मिळाली. चिरंजीवअयांश श्रेयस देशपांडे व चिरंजीव ध्रुव जयंतराव मगर यांना थर्ड रँक मिळाली.तसेच चिरंजीव सुशांत वसंत टाकणकार, अद्विका श्रेयश देशपांडे, अवधूत गणेश घाटूळ, हिंदवी दत्तात्रय घाटूळ, केदार लक्ष्मण देशमुख, रुहिका रोहित खिंडरे, प्रांजल बालाजी मोरे, समृद्धी शिवाजी व्यवहारे, तन्वी शिवाजी व्यवहारे हे विद्यार्थी चॅम्पियन झाले.अबॅकस क्लासेसच्या संचालिका सौ.नेहा प्रमोद काळे यांना सलग चौथ्या वर्षी बेस्ट टीचर अवॉर्ड व बेस्ट कन्सिस्टन्सी फ्रेंचाईजी अवॉर्ड ने देखील सन्मानित करण्यात आले.या सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे सर्व स्तरातून अभिनंदन करण्यात आले.

## गझल ही जीवन कसे जगावे हे शिकवते

### ज्येष्ठ गझलकार डॉ.गणेश गायकवाड यांचे मत

**तभा वृत्तसेवा**
**अंबाजोगाई दि.३ फेब्रुवारी**

गझल ही जीवन कसे जगावे हे शिकवते असे मत ज्येष्ठ उर्दू व मराठी गझलकार डॉ.गणेश गायकवाड यांनी दोन दिवसीय अखिल भारतीय एल्गार मराठी गझल संमेलनाचा समारोप करताना व्यक्त केले.



आद्यकवी मुकुंदराज सांस्कृतिक सभागृहात आयोजित करण्यात आलेल्या या समारोपीय सोहळ्यास प्रमुख अतिथी म्हणून जिल्हा परिषदेचे माजी सभापती राजेसाहेब देशमुख तर अध्यक्ष म्हणून संमेलनाचे अध्यक्ष डॉ. दिलीप पांढरपट्टे हे उपस्थित होते. व्यासपीठावर स्वागताध्यक्ष दगडू लोमटे, डॉ. शुभदा लोहिया, गोरख शेंद्रे, सुनील जाधव हे उपस्थित होते.

आपल्या विस्तारीत भाषणात डॉ. गणेश गायकवाड यांनी मराठी उर्दू गझलांचे संदर्भ देत महाराष्ट्रात गझल ही कशी समृध्द होत गेली ते सांगितले. गझलेची सुरुवात ही उर्दू भाषेत झालेली असली तरी आता मराठी गझल ही खुप आशयघन झाली असून उर्दू गझलापेक्षाही ती खुप पुढे गेली असल्याचे सांगितले.

गझल लेखन करण्यापुर्वी गझलकारांनी जुन्या उर्दू आणि मराठी गझलकारांनी लिहिलेल्या गझलांचा अभ्यास करणे हे खुप आवश्यक असल्याचे सांगत गझलेला आशयघन आणि समृध्द बनवण्यासाठी गझलेतील प्रत्येक शेर हा ताकदवान झाला पाहिजे असे त्यांनी सांगितले.

आपल्या भाषणात डॉ. गणेश गायकवाड यांनी आपला मराठी आणि उर्दू गझलांचा प्रवास कसा सुखकर झाला, उर्दू गझला लिहिण्यापुर्वी आपण उर्दू भाषा कशी आत्मसात केली हे सांगत त्यांनी आपल्या अनेक मराठी आणि उर्दू गझला पेश केल्या.

महाराष्ट्रात सुरु झालेला मराठी आणि उर्दू गझलांचा हा एल्गार अधिक सशक्त करण्यासाठी हे दुसरे अखिल भारतीय एल्गार मराठी गझल संमेलन अत्यंत प्रभावी आणि आशादायी ठरणार असून या संमेलनाच्या यशस्वी आयोजनाबध्दल त्यांनी साधना सेवाभावी संस्थेचे सचिव दगडू लोमटे आणि त्यांच्या सर्व सहका-यांचे मनापासून कौतुक केले.या कार्यक्रमात प्रमुख अतिथी म्हणून बोलताना राजेसाहेब देशमुख यांनी साधना सेवाभावी संस्थेचे वतीने अंबाजोगाई शहरात गझलांचा हा दोन दिवसीय दरबार अंबाजोगाईत घेतल्याबद्दल संयोजक दगडू लोमटे यांचे कौतुक करुन गझलेचे सामान्य माणसाच्या आयुष्यात किती महत्त्व आहे हे अनेक उदाहरणे देत सांगितले. यापुढे गझलेल्या कोणत्याही कार्यक्रमाला आपण मनापासून सहकार्य करु असे सांगितले.

## अखिल भारतीय केद्रिंय सरकारी पेन्शनर संघटन बीडच्या वतीने वार्षिक अधिवेशन



**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.३ फेब्रुवारी**

दि. २/२/२५ रोजी बीड येथे आखल भारतीय केद्रिय सरकारी पेन्शनर संघटना पुणे, शाखा बीड यांचे वार्षिक अधिवेशन संपन्न झाले.संघटनेचे अध्यक्ष श्री. गोपाळराव कुलकर्णी जनरल सेक्रेटरी, श्री. चौधरी एच . एफ . पुणे विभागीय संघटन सचिव श्री. राम निंबाळकर, छ. संभाजी नगर प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते कार्यक्रमांत बीड शाखा सचिव श्री. श्रीपाद चिक्षे यांनी अहवाल सादर केला प्रसंगी सभासर ए.जी. पसारकर श्री मुंडे डी आर श्री. जोशी यांनी विचार व्यक्त केले श्री राम निबांळकर यांनी सीजीएचएसयो आरोग्य सेवेची माहिती देऊन ल लाभ घेण्याचे आवाहन केले.प्रमुख पाहुणे श्री कुलकर्णी यांनी संबोधन केले.शेवटी श्री. चौधरी जनरल सेकेटरी पुणे, यांनी मार्गदर्शन केले सभासदांच्या शंकाचे निरसन करून संघटनाच्या कामाची माहिती देऊन निवेदन केले. कार्यक्रमास जिल्हा, तालुका स्तरावरीत मोठ्या संख्येने पेन्शनर हजर होते. श्री. एम.एम. हन्नुरे यांच्या अध्यक्षेते खाली सर्व कार्यक्रम संपन्न झाला. पुढील नविन कार्यकारीणी ची निवड झाली श्री जोशी यांनी सर्वांचे आभार मानून कार्यक्रमाची सांगता झाली.

## गझलेचा आशय हा समाजाभिमुख असावा-संदीप गुप्ते

### अंबाजोगाईत दुसऱ्या अखिल भारतीय एल्गार मराठी गझल संमेलनाचे उद्‌घाटन

**तभा वृत्तसेवा**
**अंबाजोगाई दि.३ फेब्रुवारी**

मराठी गझलेने आशयाचा आवाका मोठा व्यापलेला आहे. परंतु यातील आशय हा समाजाभिमुख असणे आवश्यक आहे. असे प्रतिपादन ज्येष्ठ गझलकार संदीप गुप्ते यांनी शनिवारी येथे केले.

येथील साधना सेवाभावी संस्थेच्या वतीने आयोजित दुसर्या अखिल भारतीय एल्गार मराठी गझल संमेलनाचे उदघाटन संदीप गुप्ते यांच्या हस्ते झाले. संमेलनाच्या अध्यक्षस्थानी ज्येष्ठ गझलकार डॉ. दिलीप पांढरपट्टे हे होते. यावेळी ज्येष्ठ नेते नंदकिशोर मुंदडा, माजी आमदार पृथ्वीराज साठे, ज्येष्ठ गझलकार प्रशांत वैद्य, संमेलनाचे माजी अध्यक्ष शिवाजी जवरे, योगेश्वरी शिक्षण संस्थेचे माजी अध्यक्ष डॉ. सुरेश खुरसाळे, प्रा. डॉ. सदाशिव सूर्यवंशी, स्वागताध्यक्ष दगडू लोमटे, डॉ. शुभदा लोहिया, सुनील जाधव, गोरख शेंद्रे यांची व्यासपीठावर उपस्थिती होती.

संदीप गुप्ते म्हणाले, साहित्य हे माणसाला माणसाशी जवळ आणण्याचा प्रयत्न करते, त्याचबरोबर मराठी गझलेनेही माणसं जोडण्याचा प्रयत्न केला आहे. जगालाही प्रेमाचा संदेश दिला आहे.



अध्यक्षीय भाषणात डॉ. पांढरपट्टे म्हणाले, की गझल लिहिता येण्यासाठी आपण किती साहित्य वाचतो याला महत्व आहे, वाचल्याने अनुभव विश्व समृध्द होते.गझल प्रभावी होण्यासाठी त्यातला आशय चांगला असला पाहिजे, गझल ही एक आरसा आहे. गझलेची भाषा ही साधी असली पाहिजे, गझल लिहिण्यासाठी शब्द सामर्थ्य व कवित्व असले पाहिजे, त्यामध्ये सामाजिक आशय आला पाहिजे असे गझलेचे महत्व डॉ. पांढरपट्टे यांनी सांगितले.यावेळी स्वागताध्यक्ष दगडू लोमटे यांनी संमेलनाची भुमीका मांडली, मावळते अध्यक्ष शिवाजी शिवाजी जवरे यांना नूतन अध्यक्ष डॉ. पांडरपट्टे यांना संमेलनाची सूत्रे सुपूर्द केली.

पुरस्कार

यावर्षीपासून दिला जाणारा गझल साधना पुरस्कार गझलगंधर्व सुधाकर कदम यांना प्रदान करण्यात आला. सुरेश भटांनी सोपवलेले गझलेचे मिशन शेवटच्या श्वासापर्यंत सुरूच ठेवण्याचा संकल्प श्री. कदम यांनी व्यक्त केला.

नवोदित गझलकारांचा गौरव

या कार्यक्रमात ज्येष्ठ गझलकार हेमलता पाटील यांनी आपले वडील आणि सासरे यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ प्रत्येकी एक महिला व पुरुष अशा नवोदित गझलकारांना गझलांकुर पुरस्कार देऊन गौरविण्यात आले. यामध्ये सागर पांपटवार आणि प्रियंका गिरी यांना उपस्थित मान्यवरांच्या हस्ते स्मृतिचिन्ह, शाल, श्रीफळ देऊन गौरविण्यात आले.संमेलनाचे सूत्रसंचालन अभिजित जोंधळे व प्रा. डॉ. शैलजा बरूरे यांनी केले. प्रा. मेघराज पवळे यांनी आभार मानले.

## अग्रलेख...

# केजरीवाल निवडणूक जिंकतील?

दिल्ली विधानसभेसाठी निवडणूक होत आहे. ५ तारखेला मतदान होईल आणि ८ तारखेला निकाल हाती येतील. निवडणुकीच्या निमित्ताने राजधानीतले वातावरण तापले आहे. आज संध्याकाळी ५ वाजता जाहीर प्रचार थांबेल. आरोप-प्रत्यारोपांच्या तोफा थंडावतील. असे असले तरी ज्या पद्धतीने आम आदमी पक्षाचे प्रमुख अरविंद केजरीवाल यांनी प्रचारात आरोप केलेत, यमुनेच्या बाबतीत ते जे बोलले, त्याचा फटका त्यांना बसेल, याची दाट शक्यता आहे. अरविंद केजरीवाल हे संपूर्ण देशाला माहिती असलेले एक वादग्रस्त नाव. त्यांचा जन्म वाद निर्माण करून त्यात स्वत:च अडकण्यासाठी झाला आहे की काय, असे वाटावे एवढे वाद ते उकरून काढत असतात. अरविंद केजरीवाल यांनी आपल्या वर्तणुकीने अनेक शत्रू निर्माण केले असले तरी, त्यांचे सगळ्यात मोठे शत्रू ते स्वत:च आहेत. केव्हा कुणाविरुद्ध काय आणि कसे बोलावे याचे भान ते ठेवत नाहीत आणि त्यामुळे ते वादात अडकतात. ते कुणावर कधी कोणता आरोप करतील आणि मानहानीचा दावा ओढवून घेतील, याचा काही नेम राहिलेला नाही. जनहिताची कामे करायची सोडून वाद निर्माण करण्यात त्यांना कोणता आनंद मिळतो, हे त्यांचे त्यांनाच माहीत. दिल्लीत गेली अनेक वर्षे आम आदमी पार्टीचेच सरकार आहे. त्यांच्या सत्ताकाळात जनहिताची कामे कमी आणि वादच जास्त निर्माण झाल्याचे देशाने पाहिले आहे.

सत्तेत आल्यापासूनच केजरीवाल यांनी नायब राज्यपालांशी आणि केंद्र सरकारशी पंगा घेतला. संघर्ष करण्याच्या आधीच्या भूमिकेपासून ते जराही दूर गेले नाहीत. आपण दिल्लीच्या सरकारचे प्रमुख आहोत, सचिवालयात बसलो आहोत हे विसरून ते जंतरमंतरवर आंदोलनात बसल्यासारखेच वागत राहिले. जंतरमंतरचा त्यांना अजूनही विसर पडलेला नाही. जनतेने आपल्याला भरघोस मतांनी निवडून दिले आहे आणि आता आपल्याला जनतेची कामे करायची आहेत, याची जाणीव त्यांना कधी झाल्याचे जाणवलेच नाही. डॉ. कुमार विश्वास, योगेंद्र यादव, प्रशांत भूषण यांच्यासारख्या दिग्गज सहकाऱ्यांना बाजूला सारून त्यांनी स्पर्धा कमी केली असली तरी आम आदमी पार्टी कमकुवत केली आहे आणि त्याची प्रचीती निवडणुकीत येईलच. प्रशांत भूषण हे ज्येष्ठ विधिज्ञ आहेत आणि त्यांच्याकडून पार्टीला फुकटात कायदेशीर सल्ला मिळत होता. ती संधी केजरीवाल यांनी गमावली आहे. योगेंद्र यादव हे उच्च वैचारिक पातळी (अर्थात् आम आदमी पार्टीसाठी केवळ) असलेले नेते त्यांच्याकडे होते. ते पार्टीला विचार देण्याची भूमिका पार पाडायचे. पण, त्यांना बाजूला करून केजरीवाल यांनी तीही संधी गमावली. डॉ. कुमार विश्वास हे एक कवी आहेत. त्यांनीही आम आदमी पार्टीचा जनाधार वाढविण्यासाठी संघर्ष केला. आज आम आदमी पार्टीत जे काही कुख्यात आमदार आहेत, त्यांना सांभाळण्याची आणि त्यांच्यामुळे होणारे पक्षाचे नुकसान टाळण्याची क्षमता कुमार विश्वास यांच्यात होती. पण, त्यांना पक्षातून घालवत केजरीवाल यांनी स्वत:ला कमकुवत करतानाच एक मजबूत शत्रूही तयार केला. गुप्ता बंधूंऐवजी कुमार विश्वास आणि योगेंद्र यादव किंवा प्रशांत भूषण यांना राज्यसभेवर पाठविले असते तर कदाचित आम आदमी पार्टीला आज आणखी बळकटी मिळाली असती. पण, दुर्दैवाने तसे काही घडले नाही. आंदोलनाच्या काळात जे लोक पार्टीसोबत होते, त्यांना बाजूला सारून पैशांना महत्त्व देत खास आदमींना जवळ करण्यातच आम आदमी पार्टीने धन्यता मानली, हे भीषण वास्तव आहे. दोन गुप्तांना राज्यसभेवर पाठविताना अर्थकारणाला महत्त्व देण्यात आले असा आरोप झाला असता तो जरी केजरीवाल यांनी बिनबुडाचा असल्याचे म्हटले होते, तरी त्यावर कुणीही विश्वास ठेवला नव्हता. जे गुप्ता कधीच चर्चेत नव्हते, अशा दोन गुप्तांना एकदम राज्यसभेची उमेदवारी दिल्याबरोबर देशवासीयांना आश्चर्याचा धक्कास बसला होता. पण, गुप्तांची पृष्ठभूमी लक्षात घेता देशवासीय धक्क्यातून लागलीच सावरलेही होते.

अरविंद केजरीवाल यांनी गतकाळात भारतीय जनता पार्टीचे नेते नितीन गडकरी आणि अरुण जेटली यांच्यावर भ्रष्टाचाराचे आरोप केल्यानंतर दोन्ही नेत्यांनी त्यांच्याविरुद्ध मानहानीचे खटले दाखल केले होते. नंतर केजरीवाल यांनी कोर्टात चकरा मारल्या. शेवटी भाजपाच्या या दोन्ही नेत्यांनी केजरीवाल यांना माफ करण्याचा मोठेपणा दाखवला होता, हे देशाने पाहिले आहे. माफी मागण्याची वेळ आल्याने केजरीवाल यांची प्रतिमा अधिक मलिन झाली. स्वपक्षीय राज्यसभा सदस्य स्वाती मालिवाल यांना मुख्यमंत्र्यांच्या बंगल्यात मारहाण झाली होती. त्यावरून मोठा वाद झाल्यानंतर केजरीवालांच्या पीएला अटक करण्यात आली. या अटक कारवाईमुळेही आम आदमी पार्टीची प्रतिमा डागाळली होती. पक्षाची प्रतिमा उजळ राहावी आणि जनतेचीही कामे व्हावीत यादृष्टीने पाहता केजरीवाल यांची कार्यशैली असफल ठरल्याचे कधीचेच स्पष्ट झाले आहे. आम आदमी पार्टीच्या प्रमुखाच्या म्हणजे केजरीवाल यांच्या पीएने स्वाती मालिवाल यांना मारहाण केल्यानंतर पक्षाच्या वरिष्ठ नेत्यांकडून जबाबदार वर्तणुकीची अपेक्षा होती. परंतु, नेहमीप्रमाणेच आपचे नेते बेजबाबदारपणे वागले. हे सगळे केंद्र सरकारच्या इशाऱ्यावरून घडत असल्याचा आरोप करत आम आदमी पार्टीने या प्रकरणालाही राजकीय रंग देण्याचा प्रयत्न करून राजकीयदृष्ट्या आपण अजूनही अपरिपक्व असल्याचेच दाखवून दिले होते.

कोणत्याही गोष्टीला आंधळा विरोध करायचा, कुणाहीविरुद्ध पुरावे नसताना बोलायचे अन् मानहानीच्या केसेस ओढवून घ्यायच्या, विरोधकांशी संघर्ष करण्यातच सगळा वेळ खर्ची घालायचा, या आपल्या मूळ स्वभावात केजरीवाल बदल करतील असे आज तरी दिसत नाही. सार्वजनिक जीवनात जगताना जी राजकीय शुचिता पाळणे अपेक्षित असते, तिला केजरीवाल आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी हरताळ फासला आहे. सरकार चालविण्यासाठी जो समन्वय असावा लागतो आणि सहमतीची जी भावना असावी लागते, ती केजरीवाल यांच्या सरकारमध्ये दूरदूरपर्यंत दिसत नाही. कुठल्याही प्रकारचे कायदेशीर नियंत्रण या सरकारला मान्य नाही. आम्ही म्हणू ती पूर्व दिशा या न्यायाने केजरीवाल आणि कंपू सरकार चालवू पाहात आहे. परंतु, जेव्हा आम आदमी पार्टी सरकारच्या कार्यप्रणालीवर व्यवस्थेकडून वा स्थापित यंत्रणेकडून अंकुश लावण्याचा प्रयत्न केला जातो, तेव्हा केजरीवाल आणि त्यांचे सहकारी कधी दिल्लीच्या नायब राज्यपालांवर आरोप लावतात, तर कधी थेट केंद्र सरकारच्या विरोधात जाहीरपणे बोलतात. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याविरुद्ध बोलताना तर केजरीवाल यांचा उत्साह द्विगुणित झालेला असतो. वास्तविक, दिल्ली हा केंद्रशासित प्रदेश आहे. दिल्लीला अजून पूर्ण राज्याचा दर्जा मिळाला नाही. स्वाभाविकच दिल्लीवर केंद्र शासनाचा प्रतिनिधी म्हणून नायब राज्यपालांचाच हुकूम चालणार. पण, अरविंद केजरीवाल यांना हे सत्य पचवता आलेले नाही. गेल्या विधानसभा निवडणुकीत सत्तरपैकी ६२ जागा मिळाल्या म्हणजे जनतेने आपल्याला दिल्ली दान केली या आविर्भावात ते आजही जगत आहेत. त्यांनी नेहमी संविधानाचे भान ठेवून राज्यकारभार केला असता तर वाद निर्माणच झाले नसते. परंतु, मी बहुमताने निवडून आलेला मुख्यमंत्री आहे, माझ्यावर कुणाचे नियंत्रण मला मान्यच नाही, ही त्यांची भूमिका एक दिवस त्यांना राजकारणातून बाहेर काढल्याशिवाय राहणार नाही. केंद्रात भाजपाचे सरकार आहे म्हणून दिल्लीतल्या केजरीवाल सरकारला सापत्न वागणूक मिळते या आरोपातही काही तथ्य नाही. याआधीही केंद्रात आणि दिल्लीत वेगळ्या पक्षांची सरकारे असताना दिल्ली सरकारने कायद्याच्या चौकटीत राहून काम केल्याने कधी वाद उत्पन्न झाला नव्हता. पण, केजरीवाल यांचा उद्देशच वाद उत्पन्न करण्याचा असल्याने त्याला कुणीच काही करू शकत नाही. केंद्राशी संघर्षातून केजरीवाल यांना काहीच साध्य करता येणार नाही. संघर्षाने दिल्लीचेही काही भले होणार नाही. ▮

## दिल्ली दिनांक

**रवींद्र दाणी**

# दिल्लीकरांवर बरसात आणि खैरात!

केवळ ४८ तासांनी दिल्ली विधानसभा निवडण्यासाठी मतदान सुरू होईल. काय आहे या निवडणुकीचे चित्र? 'सारे काही मोफत!' प्रगत देशांमध्ये मोफत काहीच नाही, प्रत्येक सेवेसाठी शुल्क हे धोरण असताना दिल्लीत मात्र 'सारे काही मोफत' होणार असल्याचे चित्र विधानसभा प्रचारात तयार झाले आहे आणि दिल्लीपुरता विचार केल्यास हा चुकीचा पायंडा सुरू केला आहे आम आदमी पक्षाचे नेते अरविंद केजरीवाल यांनी. समाजाच्या काही घटकांना नि;शुल्क वीज, पाणी, शिक्षण या सोयी देत सत्तेवर आलेल्या केजरीवाल यांनी या निवडणुकीत दिल्लीकरांना आणखी काही मोफत देण्याची घोषणा केली आहे. स्वाभाविकच भाजपा व काँग्रेस यांनाही तशा घोषणा कराव्या लागल्या आहेत.

**आपच्या घोषणा :** केजरीवाल सत्तेवर आल्यापासून त्यांनी समाजाच्या दुर्बल घटकांना मोफत वीज व पाणी देण्याची घोषणा केली व ती लागू केली. मात्र, ही योजना फक्त घरमालकांसाठी होती. आता ती भाडेकऱ्यांनाही लागू करण्याचा निर्णय केजरीवाल यांनी घोषित केला आहे. नि:शुल्क वैद्यकीय सोयी पुरविण्याची योजना केजरीवाल यांनी यापूर्वीच लागू केली आहे. या योजनेनुसार दुर्बल घटकांना नि:शुल्क उपचारासाठी सरकारी रुग्णालयात जाण्याची गरज नसते. ते कोणत्याही खाजगी रुग्णालयात जाऊन उपचार, वैद्यकीय चाचण्या करवून घेऊ शकतात आणि हा खर्च दिल्ली सरकारकडून त्यांना परत केला जातो. ही योजना जनतेत लोकप्रिय ठरली आहे.

**महिलांना २१०० रुपये :** मध्यप्रदेशात शिवराजसिंह चौहान सरकारने सुरू केलेली 'लाडली बहन योजना' वेगवेगळ्या नावांनी साऱ्या देशात सुरू होत असल्याचे दिसत आहे. दिल्लीत प्रचार सुरू होताच सर्वप्रथम आम आदमी पक्षाने महिलांना दरमहा २१०० रुपये देण्याची घोषणा केली. 'संजीवनी' या नावाने सुरू केल्या जाणाऱ्या या योजनेत गरीब घटकांतील महिलांना दरमहा २१०० रुपये देण्याची घोषणा करण्यात आली आहे.

**ऑटोचालकांवर मेहेरबानी :** डॉ. बाबासाहेब आंबडेकर यांच्या नावाने दलित विद्यार्थ्यांसाठी एक शिष्यवृत्ती सुरू करण्याचीही घोषणा आपच्या जाहीरनाम्यात करण्यात आली आहे. दिल्लीतील ऑटोरिक्षा चालकांनी केजरीवाल यांना पाठिंबा दिला होता. त्या बदल्यात दिल्ली सरकारने ऑटोरिक्षा चालकांसाठी यापूर्वीच काही सोयी घोषित केल्या होत्या. आता त्यात आणखी भर पडली आहे. ऑटोरिक्षा चालकांना १० लाखांचा विमा देण्याचे आश्वासन देण्यात आले आहे. त्याचप्रमाणे ५ लाखांचा अपघात विमाही काढण्याचे आश्वासन देण्यात आले आहे. शिवाय ऑटोरिक्षा चालकांना त्याच्या मुलीच्या लग्नासाठी एक लाख रुपये देण्याचे आश्वासनही जाहीरनाम्यात देण्यात आले आहे.

**२१०० विरुद्ध २५०० :** आम आदमी पक्षाने महिलांना दरमहा २१०० रुपये देण्याची घोषणा केल्यानंतर भाजपाने आपल्या जाहीरनाम्यात महिला समृद्धी योजना घोषित केली असून या योजनेनुसार महिलांना दरमहा २५०० रुपये देण्याचे आश्वासन देण्यात आले आहे. त्याचप्रमाणे महिलांना ५०० रुपये दराने गॅस सिलेंडर देण्याचे आश्वासनही देण्यात आले आहे. होळी आणि दिवाळी या सणांना दोन सिलेंडर नि:शुल्क देण्याचे आश्वासनही देण्यात आले आहे. 'आयुष्मान भारत' योजनेंतर्गत ५० लाख दिल्लीवासीयांना आरोग्य सोयी पुरविण्याचे आश्वासन देण्यात आले आहे. ज्येष्ठ नागरिकांसाठी एक सेवानिवृत्ती योजना सुरू करण्याचे वचनही भाजपाच्या संकल्पपत्रात देण्यात आले असून सेवानिवृत्ती वेतनाची राशी २५०० वरून वाढवून ती ३००० करण्याचे नमूद करण्यात आले आहे.

**पाच रुपयांत जेवण! :** केवळ पाच रुपयात चांगले जेवण पुरविण्याची घोषणा भाजपाच्या संकल्पपत्रात करण्यात आली असून 'अटल कँटिन' या नावाने ही योजना राबविण्याचे आश्वासन पक्षाने दिले आहे. याशिवाय दलित विद्यार्थ्यांसाठी डॉ. बाबासाहेब आंबडेकर यांच्या नावाने एक योजना सुरू करण्याचे आश्वासन संकल्पपत्रात देण्यात आले आहे. समाजाच्या दुर्बल घटकांतील मुलांना नि:शुल्क शिक्षण देण्याचे आश्वासन भाजपाने दिले आहे. केजी ते पीजी म्हणजे पदव्युत्तर शिक्षणापर्यंत सारे शिक्षण नि:शुल्क देण्याचे आश्वासन भाजपाने दिले आहे. भाजपाने आपल्या जाहीरनाम्यात नमूद न केलेली पण प्रचारात आणलेली एक बाब म्हणजे नायब राज्यपालांशी चांगले संबंध असलेल्या पक्षाला मतदारांनी संधी द्यावी, असे पक्षाकडून म्हटले जात आहे. याचाही परिणाम मतदारांवर होऊ शकतो. आम आदमी पक्षाचे सरकार आल्यास पुन्हा नायब राज्यपाल विरुद्ध मुख्यमंत्री असा संघर्ष सुरू होईल व त्यात सारे प्रशासन ठप्प होईल, असा विचार मतदार करू शकतात. भाजपासाठी हा मुद्दा जमेचा ठरू शकतो.

**आप सरकारची चौकशी :** केजरीवाल यांच्या सरकारने मागील १० वर्षांत घेतलेल्या सर्व चुकीच्या निर्णयांची चौकशी करण्याचे आश्वासन भाजपाच्या जाहीरनाम्यात देण्यात आले आहे. भाजपाने आपला जाहीरनामा 'संकल्पपत्र' या नावाने जारी केला असून तो तीन भागांत जारी करण्यात आला.

**प्यारी दीदी योजना :** 'लाडली बहन' या योजनेची नक्कल करीत काँग्रेसने 'प्यारी दीदी योजना' राबविण्याचे आश्वासन दिले आहे. या योजनेत महिलांना दरमहा २५०० रुपये देण्याचे आश्वासन पक्षाने दिले आहे. याशिवाय महिलांना ५०० रुपयात गॅस सिलेंडर देण्याचेही आश्वासन दिले असून होळी व दिवाळी या दोन सणांना प्रत्येकी एक गॅस सिलेंडरही दिले जाईल, असे पक्षाने म्हटले आहे. याशिवाय गरीब घटकाला दरमहा ३०० युनिट वीज मोफत देण्याचे पक्षाचे धोरण असल्याचे जाहीरनाम्यात नमूद करण्यात आले आहे. दिल्लीतील सर्व नागरिकांना २५ लाख रुपयांचा आरोग्य विमा देण्याची बाब घोषणापत्रात नमूद करण्यात आली आहे. शिक्षित पण रोजगार नसलेल्या युवकांना दरमहा ८५०० रुपये देण्याचे आश्वासनही जाहीरनाम्यात देण्यात आले आहे.

**अर्थसंकल्पाचा परिणाम :** १ फेब्रुवारी रोजी लोकसभेत सादर झालेल्या अर्थसंकल्पाचा कितपत परिणाम दिल्ली निवडणुकीवर होईल, असाही एक प्रश्न विचारला जात आहे. केंद्र सरकारने देशासाठी केलेल्या घोषणांचा परिणाम निश्चितपणे दिल्ली विधानसभा निवडणुकीवर दिसून येईल.

**आकर्षक जाहीरनामे :** आम आदमी पक्ष, काँग्रेस व भाजपा तिन्ही पक्षांनी आकर्षक जाहीरनामे जारी केले आहेत. मात्र भारतात आजवर तरी जाहीरनाम्यांच्या आधारे मतदान होत असल्याचा इतिहास नाही. या निवडणुकीत आप, भाजपा व काँग्रेस हे तीन मुख्य पक्ष रिंगणात असले, तरी खरी लढत आम आदमी पक्ष व भाजपा यांच्यातच होणार आहे. प्रत्येक निवडणुकीत मतदार एकतर एखाद्या पक्षाला विजयी करण्यासाठी मतदान करतो वा मग एखादा पक्षाला पराभूत करण्यासाठी मतदान करतो. एकतर तो आम आदमी पक्षाला विजयी करण्यासाठी मतदान करील वा मग या पक्षाला पराभूत करण्यासाठी मतदान करील. 'आप'ला भाजपा पराभूत करू शकते; काँग्रेस नाही, हेही त्याला ठावूक आहे. त्यामुळे ही लढत आम आदमी पक्ष व भाजपा यांच्यात होणार हे ठरलेले आहे. काँग्रेस पक्ष काही मतदारसंघात चांगली लढत देऊ शकतो. मात्र किती जागा पक्षाला मिळतील यावर साशंकता आहे. काँग्रेस दुहेरी आकडा गाठू शकण्याची शक्यता फारच कमी असल्याचे मानले जाते.

**एकतर्फी नाही :** २०१५ व २०२० च्या निवडणुकीत आम आदमी पक्षाला एकतर्फी कौल मिळाला होता. यावेळी तो मिळणार नाही हे निश्चित. फार कमी जागांच्या फरकाने दिल्ली विधानसभेचा निकाल लागेल. ▮

## वेध

**अनिरुद्ध पांडे**

# पडताळणी बहिणींची...!

आम्ही काही पत्रकार बोलत बसलो होतो. विषय होता सरकारी, म्हणजेच लोकांच्या पैशांचा गैरवापर आणि त्यातून होणारा भ्रष्टाचार. एकाने सांगितले, काही योजना कशा 'भ्रष्टाचारमुक्त' आहेत ते. त्यातील एक म्हणजे 'किसान सन्मान योजना' आणि दुसरी म्हणजे 'मुख्यमंत्री लाडकी बहीण योजना.' वर्षभरात सहा हजार रुपये संपूर्ण भारतातील पात्र शेतकऱ्यांच्या थेट खात्यात जमा होतात, ती म्हणजे 'किसान सन्मान योजना.' महाराष्ट्रातील पात्र महिलांच्या खात्यात दरमहा थेट १५०० रुपये जमा करणारी 'लाडकी बहीण' योजना. 'किसान सन्मान'मध्ये दोन एकरांपर्यंत शेती असलेल्या संपूर्ण भारतातील शेतकऱ्यांना दर चार महिन्यांनी प्रत्येकी २ हजार रुपये मिळतात. या हिशेबाने २०२५ च्या सुरुवातीला या प्रत्येक शेतकऱ्याच्या खात्यात असे पैसे विसाव्यांदा जमा होणार आहेत. म्हणजेच संपूर्ण भारतातील या योजनेच्या सुमारे ११ कोटी लाभार्थी शेतकऱ्यांच्या खात्यात एकूण प्रत्येकी ४० हजार रुपये जमा झालेले असतील. या योजनेतील पैसा थेट शेतकऱ्यांच्या खात्यावर जमा होत असल्यामुळे त्यात एकाही पैशाचा भ्रष्टाचार होण्याची शक्यताच नाही. तसेच आपल्या महाराष्ट्रात सुमारे २.५० कोटी पात्र लाडक्या बहिणींना दरमहा १५०० रुपये जवळपास सहा महिन्यांपासून दिले जात आहेत. ही रक्कमसुद्धा या लाडक्या बहिणींच्या खात्यात थेट जमा होत असल्यामुळे त्यातही भ्रष्टाचाराला वावच नाही. वर्षभरात त्यांना जवळपास ४० हजार कोटी रुपये दिले जातील; ते पूर्णपणे भ्रष्टाचारमुक्त असतील. पण समजा त्याच तिजोरीतून असे ४० हजार कोटी वेगवेगळ्या विकास कामांवर खर्च झाले तर त्यात कमीत कमी १० हजार कोटींचा भ्रष्टाचार अधिकृतपणे होईल.

सरकारी कामांमधील जाणकारांच्या मते तर ४० हजार कोटींमध्ये जवळपास अर्धा, म्हणजेच, २० हजार कोटींचा भ्रष्टाचार होत असतो. परवाच बीड जिल्ह्यातील भाजपाचे आमदार सुरेश धस यांनी अशा भ्रष्टाचाराबाबत सनसनाटी आरोप करून धमाल उडवून दिली आहे. आ. धस यांनी, धनंजय मुंडे हे बीडचे पालकमंत्री असताना त्यांनी चक्क ७३ कोटी ३६ लाख रुपयांची बोगस बिले दाखवून त्याचे पैसे उचलल्याचे पुराव्यांनिशी आणि तारीखवार सांगितले आहे. एकाही रुपयाचे काम न करता ७३,३६,००,००० इतके पैसे पूर्णपणे खाऊन टाकल्याचे आ. धस यांनी जाहीरपणे सांगितले आहे. म्हणजे १०० टक्के भ्रष्टाचार आणि तिजोरीही तीच महाराष्ट्र सरकारची, म्हणजेच तुमची-आमची सर्वांची..! कुठल्याही लोकोपयोगी योजनेतून, त्यातील नियम, निकषांना बाजूला ठेवून प्रसंगी खोटी माहिती देऊन, आपला कार्यभाग घेण्याची अनेकांची मानसिकता असते. तसेच काही 'लाडक्या बहिणीं'नीही केले असल्याचे गेल्या सहा महिन्यांत उघडकीस आले आहे. सध्याच्या महाराष्ट्रातील महायुती सरकारनेच आपल्या गेल्या कार्यकाळात जुलै २०२४ मध्ये 'मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण' योजना जाहीर केली. यात पात्र बहिणींच्या थेट बँक खात्यात दरमहा १५०० रुपये जमा करण्याचा प्रस्ताव होता. त्यासाठी संपूर्ण महाराष्ट्रातून २ कोटी ६३ लाख महिलांनी अर्ज केले. त्यापैकी २ कोटी ४७ लाख महिला पात्र ठरल्या. त्यातील कोणतीही त्रुटी नसलेल्या २ कोटी ३४ लाख महिलांना महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीपूर्वी दरमहा १५०० या हिशेबाने पाच महिन्यांत ७५०० रुपये थेट त्यांच्या बँक खात्यात देण्यात आले.

या एकूण २.३४ कोटींपैकी कित्येक महिला पाच महिन्यांत ७५०० रुपये तर सोडाच; पण त्यांच्या आयुष्यात कोणत्याही महिन्यात एकरकमी १५०० रुपयेसुद्धा पहिलेल्या नव्हत्या. ही वस्तुस्थिती नाकारण्यासारखी नाहीच. परिणामी, या बहिणींनीही आपले लाडके भाऊ कोण हे ठरवून टाकले. महायुतीच्या उमेदवारांना भरभरून मतांचे दान देऊन दणदणीत बहुमताने पुन्हा सत्तेत बसवले. पण पुढे नियमांप्रमाणे पडताळणी दरम्यान काही अपात्र बहिणींनी या योजनेत घुसखोरी केल्याचे निदर्शनास आले. त्यांनी चुकीची माहिती देऊन किंवा दडवून ठेवून 'लाडकी बहीण' ही पात्रता मिळवल्याचे स्पष्ट झाले. आधीपासूनच सुरू असलेल्या संजय गांधी निराधार योजनेतून निराधार बहिणींना दरमहा १५०० रुपये मिळतच आहेत. या बहिणी पुन्हा 'लाडकी' होण्यासाठी पात्र नव्हत्याच. प्रधानमंत्री 'शेतकरी सन्मान योजने'त काही महिलांना १००० रुपये मिळतच आहेत. त्यांना ५०० रुपयेच 'लाडकी'मध्ये देण्याची तरतूद आहे. पडताळणी करून काहींना वगळण्यात येणार आहे. 'पडताळणी'ची अपेक्षा नसणाऱ्या काही अपात्र बहिणींनी लाडकीमध्ये जमवून घेतले. पण आता पडताळणीत बिंग फुटेल या भीतीने चार ते पाच हजार बहिणींनी स्वत:हून आता यातून माघार घेतली आहे. अशा लाडक्या नसलेल्या बहिणी कदाचित ४ ते ५ लाखांवर जाऊ शकतील असाही एक अंदाज आहे. काहीही होवो, सध्याच्या २ कोटी ४७ लाखांपैकी २.४० कोटी बहिणी मात्र पात्र आणि लाडक्या राहणारच आहेत, हे निश्चित. ▮

९८८१७१७८२९

## कानोसा

**अमोल पुसदकर**

# अर्थसंकल्प जाणून घेणे आवश्यक

अर्थसंकल्पामधील सगळ्यात मोठी घोषणा म्हणजे सर्वसामान्य मध्यमवर्गीय आणि उच्च मध्यमवर्गीय लोकांसाठी १२ लाखांपर्यंत वाढविण्यात आलेली करमर्यादा. म्हणजे १२ लाख उत्पन्न ज्यांचे आहे, त्यांना कुठलाही कर द्यावा लागणार नाही. भारतामध्ये जवळपास ५० कोटी लोक हे मध्यमवर्गीय परिभाषेत येतात. म्हणजे इतक्या मोठ्या जनसंख्येला आपल्या भविष्याकरिता पैसे वाचविणे शक्य होणार आहे. समजा एका व्यक्तीचे वर्षाला ५० हजार रुपये वाचले व ते त्याने ते पेन्शन फंडमध्ये टाकले तरी त्याच्या भविष्याची सोय होणार आहे. यामध्ये सरकारने आपली तिजोरी भरण्यापेक्षा सर्वसाधारण माणसाच्या भविष्याची सोय केली आहे. अनेक छोटे व्यवसाय करणाऱ्यांना बँका कर्ज देत नाही. कारण त्यांच्याजवळ आयकर परतावा म्हणजे इन्कम टॅक्स रिटर्न नसतो. आता सरकारने मागील चार वर्षे जुना आयकर परतावासुद्धा भरता येईल, अशी सुविधा दिलेली आहे. यामुळे मागच्या तीन-चार वर्षांपासून ज्यांचा व्यवसाय सुरू आहे, परंतु ज्यांनी तो सरकार दरबारी दाखवला नव्हता व त्यामुळे त्यांना सरकारचे अनेक फायदे तसेच बँकांकडून कर्ज मिळू शकत नव्हते ते आता त्यांना मिळू शकणार आहे.

देशाच्या संरक्षण अर्थसंकल्पात ३७ हजार कोटी रुपयांनी वाढ करण्यात आलेली आहे. आपल्याला माहीत आहे की, भारत आता संरक्षण उत्पादनांचा निर्माता व निर्यातकर्ता झालेला आहे. नुकताच नागपुरातील एका प्रसिद्ध एक्सप्लोसिव्ह कंपनीला २००० कोटींचा ऑर्डर मिळालेला आहे. किसान क्रेडिट कार्डची मर्यादा जी ३ लाख रुपये होती, ती आता पाच लाख रुपये करण्यात आलेली आहे व कृषी मंत्रालयाला १००० कोटी रुपये अधिक देण्यात आलेले आहे. जागतिक खेळणी निर्मिती केंद्र बनविण्याचा विचार या अर्थसंकल्पात सांगण्यात आलेला आहे. याआधी जगातील खेळणी उद्योगावर चीनचे वर्चस्व होते. आता भारताने छोट्या छोट्या उद्योगांच्या माध्यमातून भारतीय खेळणे उद्योगाला नवीन ऊर्जा दिलेली आहे.

भारताच्या जंगलांमध्ये अनेक प्रकारच्या फळांचे उत्पादन होते. परंतु जंगलातील ती फळं किंवा शेतकरी ज्या फळांचे उत्पादन करतात ती फळे शहरापर्यंत पोहोचतपर्यंत खराब होऊन जातात. त्यांच्यावर कुठलेही प्रोसेसिंग म्हणजे प्रक्रिया होत नाही. यावेळेस खाद्य प्रक्रियेवर विशेष भर देण्यात आला आहे; ज्यामध्ये २०० नवीन खाद्य प्रक्रिया केंद्रे उभारली जातील.



पूर्वी नेहमी प्रश्न विचारला जायचा की, ऑलिम्पिकमध्ये भारताला पदक का मिळत नाही. परंतु मागच्या १० वर्षांमध्ये ऑलिम्पिकमध्ये भारताची कामगिरी उंचावत चाललेली आहे. ती अधिक उंचावण्यासाठी व खेळाडूंना प्रोत्साहन मिळण्यासाठी क्रीडा अर्थसंकल्पामध्ये ३५० कोटी वाढविण्यात आलेले आहे. भारत हा साहित्याचा आणि साहित्यिकांचा देश आहे. आपल्या देशातील प्रत्येकच भाषेमध्ये उच्च दर्जाचे साहित्य निर्माण झालेले आहे. परंतु ते जनतेपर्यंत सर्वत्र पोहोचण्यासाठी व त्यांच्यामध्ये वाचनाची आवड निर्माण होण्यासाठी तसेच एक कोटी ग्रंथांच्या ज्या पांडू लिपी आहेत म्हणजे मूळ कृती आहेत, त्याचेही संरक्षण व्हावे यासाठीही विशेष बजेट आरक्षित करण्यात आलेले आहे व भारतीय भाषा पुस्तक ही योजना सरकार सुरू करणार आहे. या अर्थसंकल्पासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदींनी एक घोषवाक्य सांगितलेले आहे, ते आहे 'विकास भी और विरासत भी...!'

वैद्यकीय क्षेत्रातील नवीन संशोधनांमुळे भारतामध्ये ज्येष्ठ नागरिकांची फार मोठी संख्या आहे. कॅन्सर आज संपूर्ण देशासमोर एक मोठा रोग म्हणून समोर आलेला आहे. पंजाबसारखे राज्य तर कॅन्सरच्या तावडीत सापडलेले आहे. तेथे कॅन्सर ट्रेन चालवली जाते. अशा परिस्थितीला बघून केंद्र सरकारने कॅन्सरसहित जे ३६ आजार आहेत, त्यांच्या औषधींना सीमा शुल्कातून पूर्णतः मुक्त करण्याचा निर्णय घेतलेला आहे. हा निर्णय देशातील सर्वसामान्य नागरिकांना बघून तसेच जे वैद्यकीय उपचारांनी त्रस्त झालेले आहेत, अशांचा खर्च कुठेतरी कमी व्हावा यासाठी ही सूट देण्यात आलेली आहे. त्याचप्रमाणे कॅन्सरसाठी २०० डे केअर केंद्रे स्थापित केली जाणार आहेत. देशाची लोकसंख्या वाढत आहे. त्या प्रमाणात डॉक्टरची संख्या वाढली पाहिजे यासाठी विविध मेडिकल कॉलेजमध्ये १० हजार नवीन जागा निर्माण करण्यात येणार आहेत. स्विगी, झोमॅटोसारखे काम करणाऱ्या देशातील एक कोटी गिग कामगारांना 'पीएम जय' योजनेंतर्गत आरोग्य सुविधा पुरविण्यात येणार आहे. जगातील अनेक देशांची अर्थव्यवस्था ही त्या देशांच्या पर्यटनावर चालत असते. भारत हा अतिप्राचीन देश आहे. भारताला समृद्ध इतिहास आहे व आमच्या जवळ भारतीयांना तसेच जगाला दाखविण्याकरिता अनेक प्राचीन वास्तू तथा ऐतिहासिक स्थळे आहेत. केंद्र सरकार यावेळेस भारतातील ५० पर्यटन स्थळांचा विकास करणार आहे; ज्यामुळे भारतीयांचे पर्यटन तर वाढेलच; पण विदेशी लोकसुद्धा पर्यटनासाठी भारतात येतील व भारताच्या उत्पन्नामध्ये आपला हातभार लावतील. नवीन नोकऱ्यांचे सृजन झाले पाहिजे. भारत जगाच्या सॉफ्टवेअर स्पर्धेमध्ये मागे पडता कामा नये यासाठी स्टार्टअप उद्योगांना बळ मिळावे म्हणून 'फंड ऑफ फंड्स'चे निर्माण करण्यात आलेले असून त्यासाठी १० हजार कोटी रुपये आरक्षित करण्यात आलेले आहे.

सर्वसामान्य जनतेला अर्थसंकल्प काय आहे हे माहीत नसते. त्यांना एवढेच माहीत असते की, अर्थसंकल्प म्हणजे डोक्याला त्रास देणारी कुठली तरी गोष्ट. परंतु देशाचे सरकार देशाला कोणत्या दिशेने घेऊन जाऊ इच्छित आहे त्यासाठी ते ज्या क्षेत्रांमध्ये पैसे टाकत आहेत त्या क्षेत्रांमध्येच नवीन नोकऱ्यांचे सृजन होणार आहे, नवीन उद्योगांचे सृजन होणार आहे. ज्यांना नवीन अभ्यासक्रम निवडायचा आहे, त्यांनी पण अशा क्षेत्रांची निवड केल्यास त्यांना निश्चितपणे नोकरी अथवा उद्योग उभा करता येईल. म्हणून प्रत्येक भारतीयाने आपल्या देशाचा अर्थसंकल्प काय सांगतो हे किमान जाणून घेणे आवश्यक आहे. ▮

९५५२५३५८१३

(लेखक प्रसिद्ध वक्ते, सामाजिक व राजकीय विचारक आहेत.)

## महाराष्ट्रात २०२४ मध्ये १५,३३५ अपघाती मृत्यू

२०२३ च्या तुलनेत २०२४ मध्ये रस्त्यावरील अपघातांत वाढ झाली असून त्यांची संख्या १५,३३५ एवढी आहे. एका बातमीनुसार, मुंबई-पुणे एक्स्प्रेसवरील अपघात १९ टक्क्यांनी वाढले आहेत तर समृद्धी महामार्गावरील अपघात ४ टक्क्यांनी कमी झाले आहेत. विशेष म्हणजे नऊ जिल्हे व शहरामध्ये मृत्यूमध्ये १० टक्क्यांपेक्षा जास्त वाढ झाली आहे. धुळे जिल्ह्यात सर्वांत जास्त म्हणजे २५ टक्के वाढ झाली आहे. एकूणच दिवसेंदिवस रस्त्यावरील अपघातांत मृत्यू होणाऱ्यांचे प्रमाण वाढत चालले आहे ही चिंताजनक बाब आहे. दिवसेंदिवस वाहनांची संख्या प्रचंड वाढताना दिसून येत आहे. अपघाताची कारणे विविध आहेत . त्यामध्ये वेगात वाहन चालविणे, वेग मर्यादेचे नियम डावलणे, मद्य प्राशन करून वाहन चालविणे, वाहतुकीचे नियम न पाळणे, कमी वयातील मुलांच्या हातात गाडी देऊन अपघाताला आमंत्रण देणे. वरील काही गोष्टींमुळे अपघात होत आहेत. दिवसेंदिवस नागरिकांमध्ये चारचाकी व दुचाकी वाहने घेण्याचे प्रमाण वाढत चालल्याचे दिसते आहे. आज रस्त्यावर प्रचंड वाहतूक आहे. यामुळे दिवसेंदिवस प्रदूषणाचा प्रश्न बिकट होत चालला आहे. रस्त्यावरील वाहनांना कोणतेही निर्बंध नाहीत. त्यांच्या संख्येवरसुद्धा काही मर्यादा नाही. या अपघाताला रस्त्यावरील खाजगी वाहनांची संख्या कमी करून सरकारी वाहनांची संख्या वाढविणे म्हणजेच सार्वजनिक वाहतूक व्यवस्था सुधारणे हा उपाय होऊ शकतो. त्या दृष्टीने सरकार प्रयत्न करीत आहे. पण हे प्रयत्न फारच कमी आहेत. आज पुण्यासारख्या शहरात रस्त्यावर चालणे मोठे कठीण होत चालले आहे. अशीच परिस्थिती इतर शहरांत दिसून येते. केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी देशात २०२४ मध्ये १.८० लाख मृत्यू झाल्याचे सांगितले आहे ही संख्या खरे तर प्रचंड आहे. ही संख्या हळूहळू कमी करता येईल का, याकडे सर्वांचेच लक्ष हवे.



**शांताराम वाघ**/९६२३४५२५५३

## वाचक पत्रे

### जीबीएसचा प्रादुर्भाव अन् जागजागृती

दिवसेंदिवस नवीन आजाराची उत्पत्ती होत असताना पुणे शहर आणि आसपासच्या परिसरात जीबीएसचा प्रादुर्भाव मोठ्या प्रमाणात होत आहे. असे असताना जीबीएस कोणत्या कारणामुळे होत आहे, नागरिकांनी कोणत्या प्रकारची काळजी घ्यावी, यावर कुठले प्रतिबंधात्मक उपाय करणे आवश्यक आहे, याबद्दल तज्ज्ञ डॉक्टरांकडून वेळोवेळी योग्य मार्गदर्शन होणे आवश्यक आहे. जेणेकरून नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण न होता जनजागृती होईल आणि आजाराला आळा बसेल. प्रसारमाध्यमांनी जनतेला विश्वासात घेऊन सत्य परिस्थिती सांगितली पाहिजे आणि नागरिकांनी सतर्क राहून यंत्रणेला सहकार्य करणे तितकेच गरजेचे आहे.

**मयूर प्रकाशचंद्र बजाज**/९४२१४४९१३०

### संत असे महान!

पती आणि पिता यांना संसारात फक्त दोन थेंबांच्या सुखाची अपेक्षा असते. जीवन समुद्राच्या काठावर सर्वांच्या कल्याणाकरिता पोटतिडिकीने बोलणारे जड ओझे घेऊन चालणारे आणि कोणीच समजून घेत नाही म्हणून आपले मन मशालीसारखे आतल्या आत जळत ठेवणारे; दुःखाचे प्रदर्शन न करता मनातले शब्द मनातच ठेवणाऱ्या अशा संतांचे दुःख हळव्या मनाच्या स्त्रिया का समजून घेत नाहीत? वेदनांना काळजातच ठेवून, अनेक अपमान सहन करीत सातत्याने कष्ट करणारे, सर्वांच्या आवडीचा अभ्यास करून परिवार सुखी, आनंदी ठेवणाऱ्या पत्नीला आणि मुलीला त्यांच्याबद्दल माया का वाटत नाही? शेवटी आपले मन मोकळे करण्याचा एकच मार्ग उरतो तो म्हणजे आपला सखा (मित्र). पुरुषांना काळीजच नाही हा सिद्धांत मांडून त्यांना नर्मदेचा गोटा म्हणण्यापर्यंतची मजल जाते! वेदनांना कुशीत घेऊन मुक्यानेच एकतारी भजन म्हणणाऱ्या अशा संतासाठी कुणी आसवे गाळलेली आठवतात का? नसतील तर दोन थेंब सुखाने पिता आणि पती असणाऱ्या संतांना ऊर्जा देऊन आपले जीवन सुखी करा. लहानशा काजव्यात अंधार फेडायची पण ताकद असते. कुठेतरी मनात कर्माची भीती असते म्हणूनच गंगा स्नान घडते. १०००० रुपयात सगळे घर चालवतो तरी तो सर्वांच्या नजरेत अपयशी ठरतो. अशा पतीला किंवा पित्याला घरच्यांचे दोन थेंब सुख मिळाले तर ते त्यांचे लाख रुपयांचे सुख असते. पत्नीच्या कष्टाची दखल आणि नवऱ्याच्या कर्तृत्वाचा अभिमान बाळगला की संसार नक्कीच सुखाचा होतो. म्हणूनच संत महान असतात. ▮

**अमोल करकरे**/९९६७९२७६१७

वाचक पत्रे पाठविण्यासाठी ईमेल ॲड्रेस
tbedit2016@gmail.com

हे पत्र मुद्रक व प्रकाशक कुलभूषणराम रामकृष्ण तारे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय प्लॉट नं ए -३२,छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रियल को ऑफ सोसायटी रेल्वे स्टेशन रोड छत्रपती संभाजी नगर ४३१००५ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक सोलापूर तरुण भारत कार्यालय,छत्रपती संभाजीनगर येथे प्रकाशित करून छत्रपती संभाजीनगर, जालना,परभणी,नांदेड, हिंगोली ,बीड येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून वितरीत केले.
प्रबंध संपादक :विवेक घळसासी. मुख्य समुह संपादक : दिलीप यशवंत पेठे. मुख्य संपादक: प्रशांत वसंतराव माने, दूरध्वनी -८८८८८४७२६८ RNI Reg.No 46878/87
stbaurangabad@gmail.com. www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

# जलजिवन मिशनच्या अपूर्ण कामांमुळे अंतर्गत रस्त्याची वाताहत

## पावसाळ्यात चिखलाचा तर उन्हाळ्यात धुळीचा त्रास

**तभा वृत्तसेवा**
**इस्लापूर,दि. ०३ फेब्रुवारी**

इस्लापूर येथील जलजिवन मिशन अंतर्गत पाणी पुरवठा योजनेच्या कामाला भ्रष्टाचाराची वाळवी लागल्यामुळे लाखो रूपये खर्च होऊनही काम अपूर्ण अवस्थेत आहे. ठेकेदार यांनी जलजिवन प्राधीकरण विभागाच्या अभियंत्यांच्या हातावर तुरी दिल्यामुळे की, काय? शाखा अभियंत्यापासून ते उप अभियंता व तसेच अधीक्षक अभियंता ही मूग गिळून गप्प बसले असल्याने मोठे आश्चर्य व्यक्त होत असून अपूर्ण अवस्थेत थांबून असलेल्या या कामामुळे पावसाळ्यात चिखलाचे साम्राज्य पसरले, आणी आता उन्हाळ्याच्या प्रारंभावर धुळीचा त्रास मात्र इस्लापूरकर वाशीयांना सहन करावा लागत आहे.

इस्लापूर गावांच्या कायमस्वरूपी पाणी पुरवठ्यासाठी शासनाकडून कोट्यावधी रूपयांचा निधी मंजूर झाला. प्राप्त निधीतून विहिर व व पाईपलाईन सह इतर सर्व कामे करणे गरजेचे होते. विशेषकरून गावात पाणी पुरवठा करण्यासाठी अंतर्गत रस्ते खोदकाम करून पाईपलाईन पूर्णत्वास गेल्यानंतर पहिल्या सारखे रस्ते दुरूस्त करून देणे प्राधीकरण विभागाची जिम्मेदारी होती. शासनाच्या अंदाजपत्रकात या सर्व बाबी अधिरोकीत केलेल्या आहेत. परंतू या कामाचे ठेकेदार मात्र फारच चलाख निघाले. त्यांनी जलजिवन प्राधीकरण विभागांच्या सर्वच यंत्रनेला मॅनेज केल्यामुळे की, काय? वरिष्ठ अधिकारी अधिक्षक अभियंता ही या गंभीर बाबींकडे लक्ष द्यायला तयार नाहीत. इस्लापूर च्या पाणी पुरवठ्याच्या बोगस कामाची तक्रार जिल्हाधिकारी यांनाही देवून भाजपचे जिल्हासचिव काशिनाथ पाटील शिंदे यांनी या सर्व बाबींची माहीती फोटोसहित देवून भ्रष्टाचाराची सर्व माहीती अवगत करून दिली आहे. आता जिल्हाधिकारी यांना निवेदन देऊन ही अनेक दिवसांचा कालावधी संपुष्टात येत आहे. परंतू आश्चर्यकारक अशी बाब ठरते आहे की, वरिष्ठ अधिकारी ही इकडे लक्ष घालत नसल्याने न्याय मागावा तरी कोणाकडे? असा प्रश्न या निम्मितानै उपस्थित केला जात आहे. उन्हाळ्याच्या प्रारंभावर सर्वच ठिकाणच्या नैसर्गिक पाणवठ्याचे बाष्पीभवन होत असल्याने पाण्याची तीव्र टंचाई निर्माण होत आहे. इस्लापूर हे निजामकालीन बाजार पेठेचे गाव आहे. शासन स्तरावर तालूका निर्मितीची मागणी आहे. अश्या मोठ्या गावात पाणी पुरवठा योजनेचे काम दर्जेदार होणे अपेक्षित होते. पैनगंगेवरून इस्लापूर गावाला पाणी पुरवठा करण्यासाठी जलजिवन मिशन प्राधीकरणच्या अभियंत्यांनी शक्कल लढविली. परंतू पैनगंगेतच पाणी नसल्याने पाणी पुरवठा कसा करणार ? असा प्रश्न ही या निम्मित्ताने उपस्थित होत आहे. एकंदरीत पाणी पुरवठा योजना ही भ्रष्टाचाराच्या खोल गाळात रूतली असल्याने गावकऱ्यांना पाण्यासाठी दाहीदिशा भटकंती करावी लागत आहे. आता पैनगंगेत पाणी नसल्याने या भागातील नागरिक इसापूर प्रकल्पांतून पैनगंगेत पाणी सोडावे म्हणून मागणी करीत आहेत. नुसती मागणी करूनही थांबले नाही तर नदी पात्रात आमरण उपोषण सुरू केले आहे तरी प्राधीकरण विभाग मात्र गाढ झोपेत आहे. आता गेंड्याची कातडी ओढवून बसलेल्या या अभियंत्याला अभय कोणाचे हे न समजणारे कोढे ठरत असून, गावांतील नागरिकांच्या भावनेचा उद्रेक होण्या अगोदर ग्रामपंचायत प्रशासनाने जागरुकता दाखवावी. अशी मागणी आता गावांतील सुजाण नागरिकांतून पुढे आली आहे.

# आमदार चिखलीकरांनी घेतली सर्व विभागाच्या अधिकाऱ्यांची आढवा बैठक!

**तभा वृत्तसेवा**
**कंधार,दि. ०३ फेब्रुवारी**



कंधार-महाराष्ट्रातील सुप्रसिद्ध आसणारे श्री संत नामदेव महाराज देवस्थान श्री क्षेत्र उमरज येथे दिनांक २७ फेब्रुवारी ते ६ मार्च दरम्यान होणाऱ्या अंखड हरीनाम सप्ताह सह श्रीमद् भागवत कथा १०८ कुंडी विष्णूयाग महायज्ञ व कलशारोहण, कार्यक्रमाचे दिनांक २ फेब्रुवारी रोजी ध्वजपुजन व कथामंडप भुमिपुजन मठाधीपती एकनाथ गुरु नामदेव महाराज यांच्या शुभहस्ते आमदार प्रतापराव पाटिल चिखलीकर यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न झाले .याच पार्श्वभूमीवरआमदार चिखलीकर यांनी नांदेड जिल्हाअधिकारी, पोलीस अधीक्षक, मुख्यकार्यकारी अधिकारी यांच्या सह कंधार लोहा तालुक्यातील सर्व विभागाच्या आधिकार्यांची आढावा बैठक घेतली. दिनांक २ फेब्रुवारी रोजी श्री क्षेत्र उमरज येथे आमदार चिखलीकर यांच्या अध्यक्षतेखाली घेण्यात आलेल्या आढावा बैठकीत दररोज किमान १लाख व दिनांक ४ मार्च रोजी कलशारोहण कार्यक्रमाला ३ लाख भाविकभक्त उपस्थितीत राहतील असा अदांज मठाधीपती एकनाथ महाराज यांनी वर्तवीला यास अनुसरुन भाविकांसाठी सुरक्षा बंदोबस्त, आरोग्य, पिण्याचे पाणी, विद्युत पुरवठा, बस वाहतूक, कार्यक्रमाची जागा, पार्कींग व्यवस्या, स्वच्छता ,आग्नीशामक व्यवस्था आदि विषयावर संबधीत अधिकाऱ्यासोबत आ. चिखलीकर यांनी सविस्तर चर्चा करुन आढावा घेतला व त्याची तुरंत पुर्तता करण्याच्या सुचना संबधीत अधिकाऱ्याना दिल्या.

यावेळी प्रमुख उपस्थिती, जिल्हाधिकारी अभिजित राउत, पोलिस अधीक्षक अबिनाश कुमार, मुख्यकार्यकारी अधिकारी मिनल करणवाल, उपजिल्हाधिकारी अरुणा संगेवार, उपविभागीय पोलिस अधिकारी अश्विनी जगताप, जिल्हा आरोग्य अधिकारी संगीता देशमुख व इतर सर्व जिल्हा व तालुका अधिकारी यांच्यासह गावातील प्रतिष्ठित नागरीक व परिसरातील भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## संक्षिप्त वृत्त

### रमाई आंबेडकर जयंतीच्या अध्यक्षपदी जोगदंड तर स्वागत अध्यक्ष पदी वाघमारे यांची निवड

**नवीन नांदेड**-माता रमाई आंबेडकर जयंती महोत्सव सिडकोच्या रमाई आंबेडकर जयंतीच्या अध्यक्षपदी सौ. शोभाताई जोगदंड तर स्वागत





अध्यक्ष पदी सामाजीक कार्यकर्ते राजू वाघमारे भिमवाडी यांची बिनविरोध निवड करण्यात आली आहे. सिडको येथे दरवर्षीप्रमाणे याही वर्षी माता रमाई आंबेडकर जयंती महोत्सव मोठ्या उत्साहात साजरा करण्यात येणार असून हा महोत्सव दिनांक २३ फेब्रुवारी २०२५ रोजी घेण्याचे आयोजिले आहे. माता रमाई आंबेडकर जयंती महोत्सव सिडकोच्या अध्यक्षपदी सामजिक कार्यात अग्रेसर असलेल्या तथा हाडको येथील पंचशील बुद्ध विहार रमाई महिला मंडळाच्या अध्यक्षा सौ.शोभाताई प्रदिप जोगदंड यांची सर्वानमते निवड करण्यात आली. याच वेळी संयोजन समितीने स्वागत अध्यक्ष म्हणून सामाजिक कार्यकर्ते राजू वाघमारे यांचीही निवड करण्यात आली आहे. तेव्हा याप्रसंगी सौ. शोभाताई जोगदंड यांचा सत्कार करण्यात आला तर स्वागत अध्यक्ष राजू वाघमारे यांचेही समितीच्या वतीने स्वागत करण्यात आले. तेव्हा उपस्थितांनी दोन्हीही अध्यक्षांचे अभिनंदन करून पुढील कार्यास शुभेच्छा दिल्या.

### शेतकरी लाभार्थ्यांना ७८ लाखाचे अनुदान वाटप

**माहूर**-माहूर तालुक्यातील एपीएल शेतकरी शिधापत्रिका धारक लाभार्थी योजनेअंतर्गत ज्या शेतकऱ्यांच्या नावे सातबारा आहे व ज्यांना स्वस्त



धान्य दुकानदाराकडून स्वस्त धान्य मिळत होते अशा लाभार्थ्यांसाठी शासनाकडून कुटुंबातील महिलांना थेट लाभार्थी बनवून त्यांच्या बँक खात्यात डीबीटी म्हणजेच थेट लाभ हस्तांतरण प्रणालीद्वारे अन्नधान्या ऐवजी मिळणारी रक्कम त्यांच्या खात्यात जमा करण्याचे आदेशित केल्याने माहूर तालुक्यातील १हजार ५९८ लाभार्थ्यांच्या खात्यावर ७८ लाखांवर रक्कम जमा करण्यात आली आहे. माहूर तालुक्यात शेतकरी लाभार्थी योजनेअंतर्गत एकूण ३ हजारी ४१४ एपीएल शेतकरी शिधापत्रिका असून, एप्रिल २०२३ ते डिसेंबर २०२३ पर्यंतचे ७८ लाख ७५ हजार रुपये महिला कुटुंबप्रमुखांच्या खात्यात जमा करण्यात आले आहे.तर २०२४ चे अनुदान येणे बाकी आहे. त्यामुळे शेतकरी लाभार्थ्यांसाठी डीबीटी म्हणजेच थेट लाभ हस्तांतरणाद्वारे महिला कुटुंब प्रमुख असलेल्या कुटुंब प्रमुखाचे नावे तात्काळ अनुदान जमा करण्यात येत असून, शेतकरी लाभार्थ्यांनी तात्काळ आपापल्या स्वस्त धान्य दुकानदाराकडे राशन कार्ड, सर्वांचे आधार कार्ड, महिला कुटुंब प्रमुखाचे पासबुक झेरॉक्स प्रतीत मोबाईल नंबर सह जमा करावयाचे आहेत. शासनाने जाहीर करताच अनेक दिवसांपूर्वीच अधिसूचना प्रकाशित करण्यात आली असूनही अनेक शेतकऱ्यांनी आपापली कागदपत्रे जमा केली नसल्याने अनुदान वाटपात अडचणी निर्माण होत आहेत. त्यामुळे शेतकऱ्यांनी तात्काळ कागदपत्रे आपापल्या स्वस्त धान्य दुकानदाराकडे किंवा तहसील कार्यालयात जमा करावीत ! असे आवाहन तहसीलदार किशोर यादव यांनी केले आहे.यावेळी पुरवठा निरिक्षण अधिकारी निलेश राऊत, पुरवठा निरीक्षक गजेंद्र मिरजगावे, लिपिक संतोष पहुरकर ,गोदाम व्यवस्थापक मिलिंद वाठोरे, लिपिक वैभव पांढरे उदय वानखेडे यांचे सह सर्व कर्मचारी उपस्थित होते.

# शासकीय सेवा व योजनांच्या महाशिबिराची जय्यत तयारी

**तभा वृत्तसेवा**
**किनवट,दि. ०३ फेब्रुवारी**

येत्या शनिवारी (दि.८) तालुका क्रीडा संकुलात होणा-या शासकीय सेवा व योजनांच्या महाशिबिराची जय्यत तयारी सुरू आहे.या संदर्भाने तयारीचा आढावा घेण्यासाठी आज(दि.३) दुपारी तालुका विधी सेवा समितीच्या वतीने पंचायत समितीच्या सभागृहात व न्यायालयात बैठक संपन्न झाली. यावेळी न्यायाधीश पी.बी.माने व न्यायाधीश के.जी.मेंढे यांनी मार्गदर्शन केले.वकील संघाचे अध्यक्ष ॲड.राहुल सोनकांबळे,सचिव सुनिल सिरपुरे,तालुका विधी सेवा समितीचे सदस्य ॲड.मिलिंद सर्पे ,ॲड.पंडीत घुले,ॲड.टी. एच.कुरेशी यांची यावेळी प्रमुख उपस्थिती होती. सूत्रसंचालन ग्रामविकास अधिकारी श्री.ताडेवार यांनी केले. प्रास्ताविक व आभारप्रदर्शन विस्तार अधिकारी वाघमारे यांनी केले.बैठकीस ग्राम विकास अधिकारी, ग्रामसेवक व नागरिक उपस्थित होते.न्यायालयात झालेल्या बैठकीस सर्व वकील उपस्थित होते. महाशिबिर यशस्वी करण्याचा बैठकीत निर्धार करण्यात आला.

# दिव्यांगाकडे पाहून जगण्याची ऊर्जा व स्फूर्ती मिळते -अति. मुख्य कार्यकारी अधिकारी संदीप माळोदे

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड,दि. ०३ फेब्रुवारी**

दिव्यांग व्यक्तिमध्ये सामान्य व्यक्ती पेक्षा वेगळी शक्ती असून त्याच्याकडे पाहून जगण्याची ऊर्जा व स्फूर्ती मिळते असे प्रतिपादन जिल्हा परिषदेचे अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी संदीप माळोदे यांनी दिव्यांगाच्या जिल्हास्तरीय क्रीडा स्पर्धेच्या उदघाटन प्रसंगी केले. यावेळी त्यांनी दिव्यांग विद्यार्थ्यांना शिकविणाऱ्या शिक्षक व कर्मचाऱ्यांचे कौतुक देखील केले आहे.



जिल्हा परिषदेच्या समाज कल्याण विभागातर्गत जागतिक दिव्यांग दिनाचे औचित्य साधून ३ फेब्रुवारी रोजी पोलीस कवायत मैदानात दिव्यांगाच्या जिल्हास्तरीय क्रीडा स्पर्धा घेण्यात आल्या. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी जिल्हा परिषदेचे अति. मुख्य कार्यकारी अधिकारी संदिप माळोदे,जिल्हा विधी सेवा प्राधिकरणच्या सचिव श्रीमती दलजीत कौर जज,उप मुख्य कार्यकारी अधिकारी अधिकारी राजकुमार मुक्कावार,समाज कल्याण विभाग लातूरचे प्रादेशिक उपायुक्त अविनाश देवसटवार,समाज कल्याणचे सहाय्यक आयुक्त शिवानंद मिनगिरे,बापू दासरी, जिल्हा समाज कल्याण अधिकारी सतेंद्र आऊलवार यांची प्रमुख उपस्थिती होती. या जिल्हास्तरीय क्रीडा स्पर्धेत दिव्यांगाच्या अस्थिव्यंग, मतिमंद, मूकबधिर, अंध प्रवर्गातील ७० शाळेतील जवळपास साडे सातशे मुले व मुली सहभागी झाले होते. प्रथमता हेलन केलर यांच्या प्रतिमेचे पूजन करून व दिव्यांग मुलांच्या हस्ते मशाल पेटवून या स्पर्धेला सुरुवात करण्यात आली. या प्रसंगी बोधडी येथील अंध विद्यार्थ्यांनी उपस्थित प्रमुख पाहुण्यांचे गीत गाऊन स्वागत केले. विद्यार्थ्यांची गैरसोय होऊ नये म्हणून जिल्हा समाज कल्याण अधिकारी सतेंद्र आऊलवार यांनी जिल्ह्यातील सर्व दिव्यांग शाळेतील मुख्याध्यापक, अधीक्षक, शिक्षक व कर्मचारी यांच्या विविध समित्या स्थापन केल्या असून वै. सा. का. कैलास मोरे यांच्या मार्गदर्शनाखाली दिव्यांग मुला- मुलीच्या निवासाची व भोजनाची चोख व्यवस्था बजावण्यात आली होती. दिनांक ४ फेब्रुवारी रोजी दहा वाजता दिव्यांग विदयार्थ्यांच्या सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन कुसुमताई चव्हाण सभागृहात करण्यात आले आहे.

**विकलांगाच्या उन्नतीसाठी तंत्र ज्ञानाचा वापर करावा- दलजीत कौर जज**

आज काल तंत्रज्ञान दिवासोंदिवस प्रगत होत असून विकलांग मुले मुली जन्मास येऊ नये यासाठी तंत्रज्ञानाची मदत घ्यावी व विकलांग विद्यार्थ्यांच्या उन्नती साठी पालकांनी व शिक्षकांनी तंत्रज्ञानाचा वापर करावा असे प्रतिपादन जिल्हा विधी सेवा प्राधिकरणच्या सचिव

श्रीमती दलजीत कौर जज यांनी दिव्यांग मुलामुलींच्या जिल्हास्तरीय क्रीडा स्पर्धेत केले आहे.

# ऊस पुरवठा प्रोत्साहन योजनेचे जास्तीत- जास्त शेतकरी बांधवांनी लाभ घ्यावा : सुभाषराव देशमुख

**तभा वृत्तसेवा**
**हदगाव,दि. ०३ फेब्रुवारी**

शिऊर साखर कारखाना लि. वाकोडी व श्री सुभाष शुगर प्रा. लि. हडसणी या कार्यक्षेत्रातील ऊस उत्पादक शेतकरी बांधवांनी गाळप हंगाम २०२४-२५ करिता उद्दिष्ट एवढे गाळप करण्याकरिता १ फेब्रुवारी २०२५ ते १६ मार्च २०२५ च्या पुढे ऊस पुरवठा केल्यास हमीभावापेक्षा वाढीव प्रति टन जादा दर प्रोत्साहन योजनेचे लाभ घेण्याचे आव्हान शिऊर साखर का. म. वाकोडी ता. कळमनुरी व श्री सुभाष शुगर प्रा. लि. हडसणी ता. हदगाव या दोन्ही कारखान्याचे अध्यक्ष सुभाषराव लालासाहेब देशमुख यांनी केले आहे.



शिऊर साखर कारखाना लि. वाकोडी व श्री सुभाष शुगर प्रा. हडसणी या दोन्ही कारखाना कार्यक्षेत्रातील ऊस उत्पादकांच्या सहकार्याने गाळप हंगाम २०२४-२५ यशस्वीपणे चालू असून दोन्ही कारखान्यात मिळून प्रतिदिन ८००० मे. टन गाळप चालू आहे. शासन निर्णयानुसार कारखाना १५ दिवस विलंबनाने चालू झाल्यामुळे व ऑक्टोबर महिन्याचे ऊस क्षेत्र जास्त असल्याने ऊस तोडीस थोडा विलंब होत आहे. दोन्ही कारखाना कार्यक्षेत्रात १५ मार्चपर्यंत संपूर्ण ऊस संपविण्याचे कारखान्याचे नियोजन असून ऊस उत्पादक शेतकरी बांधवांनी घाबरून न जाता इतर कारखान्यास गळीतास आपला ऊस देऊ नये कारण चांगल्या झालेल्या पाण्यामुळे उसाचे उत्पादन वाढण्याची दाट शक्यता असून ते आपले ऊस घेऊन जाणार नाहीत तरी आपल्या हक्काच्या शिऊर साखर का. लि. वाकोडी व श्री सुभाष शुगर प्रा. लि. हडसनी या कारखान्यास ऊस द्यावे. शेतकऱ्यांच्या हितासाठी व समृद्धीसाठी आम्ही सतत प्रयत्नशील असून प्रथम उचल २५०० रु. प्रमाणे तर टप्प्याटप्प्याने मार्च महिन्यात पर्यंत २७०० रु. प्रति टन मिळणार आहे. तरी जास्तीत- जास्त शेतकरी बांधवांनी ऊस लागवड करून सहकार्य करावे व सदरील प्रोत्साहन योजनेचे लाभ घ्यावे तसेच ऊस गाळप संदर्भात किशोर वानखेडे मुख्य शेतकी अधिकारी संपर्क क्र.९४२३४३६६२१, मधुकर पतंगे डे.जनरल मॅनेजर संपर्क क्र.९४०४९००८२८ यांच्याशी संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले.

# राज्य युवा पुरस्कारासाठी अर्ज करण्याचे आवाहन

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड,दि. ०३ फेब्रुवारी**

राज्य युवा पुरस्कारासाठी आपले अर्ज जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालयात १५ फेब्रुवारी पर्यंत जमा करण्यात यावे, असे आवाहन जिल्हा क्रीडा अधिकारी जयकुमार टेंभरे यांनी केले आहे. राज्य युवा पुरस्कारासाठी युवक अथवा युवा विकासाचे कार्य करणाऱ्या संस्था यांची गत तीन वर्षामध्ये केलेल्या कामगिरीचे मुल्यांकन विचारात घेण्यात येणार असून राज्य युवा पुरस्कार सन २०२३-२४ साठी अर्ज शनिवार १५ फेब्रुवारी २०२५ पर्यत जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालयात सादर करणे आवश्यक राहणार आहे. राष्ट्र व राज्य निर्माणामध्ये युवकांची महत्त्वपूर्ण भूमिका असून मोठया संख्येने युवावर्ग, संस्था राज्यात सामाजिक कार्य करीत आहेत.

# शांतीवर्धक हायस्कूल कुन्मारपल्ली येथे सेवापूर्ती गौरव सोहळा

**तभा वृत्तसेवा**
**देगलूर,दि. ०३ फेब्रुवारी**



देगलूर तालुक्यातील हानेगाव परिसरात दि. १ फेब्रुवारी शांतीवर्धक हायस्कूल कुन्मारपल्ली येथील मुख्याध्यापक अंणदुरे एन .एम. व सहशिक्षक कवळखेडे डी. टी. यांचा नियत वयोमानानुसार त्यांची सेवा पूर्ण झाल्यामुळे त्यांचा सेवापूर्ती गौरव सोहळा आयोजित करण्यात आला होता.

या कार्यक्रमाचे अध्यक्ष श्री. १०८ शंकर लिंग शिवाचार्य महाराज हिरेमठ संस्थान हाणेगाव हे होते. तसेच या कार्यक्रमाचे प्रमुख व्याख्याते म्हणून मा. डॉ. राजेश्वर दूडूकनाळे हे होते. अथक परिश्रम केल्याशिवाय पर्याय नाही, शिक्षणामुळेच माणसाची खूप मोठी प्रगती होऊ शकते असे मत डॉ. दुडूकनाळे यांनी व्यक्त केले. अनेक महामानवाच्या जीवनातील उदाहरणे देऊन विद्यार्थी व पालक यांना अनमोल असे मार्गदर्शन केले. या कार्यक्रमासाठी बिजलवाडी, कुन्मारपल्ली रमतापूर, येडूर, येथील विद्यार्थी, पालक, सरपंच उपसरपंच व प्रतिष्ठित नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन चव्हाण एस.टी. व मठपती एम .एम. यांनी केले. आभार प्रदर्शन सुंकेवार यांनी केले. याप्रसंगी शाळेतील गुणाले सर, पवार सर, मुलगे सर, धाडगे, चलवे इत्यादी कर्मचारी उपस्थित होते.

# पोलिस निरिक्षक नागनाथ आयलाने विरुध्द गुन्हा दाखल

**तभा वृत्तसेवा**
**लोहा,दि. ०३ फेब्रुवारी**

छत्रपती शिवाजी महाराज चौकातील सेवा जनशक्ती पक्ष कार्यालयात जाऊन विधानसभा निवडणूक मतमोजणीच्या दिवशी जनशक्ती पक्षाच्या पदाधिकाऱ्यांवर लाठी व हल्ला केल्या प्रकरणी पोलीस निरीक्षक नागनाथ आयलाने यांच्याविरुद्ध जिल्हा न्यायाधीशांच्या आदेशानुसार लोहा न्यायालयात गुन्हा दाखल करण्यात आल्याची माहीती सेवा जनशक्ती पार्टीचे पक्षप्रमुख प्रा.मनोहर धोंडे यांनी दिली आहे.

विधानसभेचे मतदान २० नोव्हेंबर रोजी पार पडले तर मतमोजणी २३ नोव्हेंबर २०२४ च्या दरम्यान जनमतातुन चार नंबरवर असलेला उमेदवार नंबर एकवर येवून विजयी कसा होतो, आमचे लक्ष विचलित करण्यासाठी विजयी उमेदवारांच्या इशाऱ्यावर लोहा ठाण्यात नव्याने रुजु झालेले पोलिस निरिक्षक नागनाथ आयलाने यांनी जाणीवपूर्वक सेवा जनशक्ती संपर्क कार्यालयात घुसून लाठीचार्ज केला तो नियमबाह्य होता. महाराष्ट्रात सर्व पोलीस ठाण्याला परिपत्रक पाठविले होते की, निवडणूक काळात कुठलाही अनुचित प्रकार घडताना निर्णय घ्यायचा झाला तर त्यासाठी त्यांनी मॅजीस्टेटची नियुक्ती केली पाहिजे होती पण तसे पोलिस निरीक्षक नागनाथ आयलाने यांनी केले नाही.

विजयी होणाऱ्या उमेदवारांचे ऐकून सेवा जनशक्ती पार्टीच्या पदाधिकारी व कार्यकर्त्यांना कार्यालयात जाऊन त्यांच्यावर लाठीहल्ला करून त्यांना जखमी केले. याप्रकरणी लोह्याचे पोलीस निरीक्षक नागनाथ आयलाने यांच्या जबाबावरून महादू धोंडे (५४) वर्षे, विजय ऊर्फ राजू चपटे (३५) वर्षे, माधव भुरे (२८) वर्षे, करण वडजे (१९) वर्षे यांच्याविरुध्द गुरनं ३९४/२०२४, भादवि कलम १३२, १८१(१), १८९(२) ,१८९(३),१८९ (४),१८९ (५) ,१२१(१), ४९, ५४, सहकलम १३५ महाराष्ट्र पोलीस कायदा दाखल करण्यात आला होता. या प्रकरणात ३ दिवस कोठडी मिळण्यासाठी पी.व्ही. चिद्रे न्यायदंडाधिकारी लोहा यांच्या समोर .२४ नोव्हेंबर २०२४ रोजी हजर केले असता आरोपी १ ते ४ ने पोलिसांनी मारहाण केल्याची तक्रार केली होती. तसेच आरोपींना सरकारी रुग्णालय विष्णुपुरी नांदेड येथे वैद्यकीय तपासणीसाठी पाठविले होते. सदर तपासाणी अहवाल प्राप्त झाल्यानंतर पोलिसांनी मारहाण केल्याचे त्यांच्या निदर्शनास आल्यामुळे सदर बाबींचा अहवाल मा.जा.क्र. २४२३/२०२४ .२७ नोव्हेंबर २४ नुसार प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश नांदेडनुसार पोलिस निरीक्षक आयलाने विरुध्द आयपीसी कलमा नुसार गुन्हा दाखल करून चार्ज शीट झाली आहे. कोर्टात त्याचे ट्रायल सुरू झाला असून आरसीसी नंबर ५/२०२५ आहे. या व्यतिरिक्त उच्च न्यायालय खंडपीठ संभाजीनगर येथे याचिका क्र. २०११ /२०२४ दाखल करण्यात आली आहे. ही याचिका करण साधू वडजे आणि अन्य कार्यकर्त्यांच्या माध्यमातून ५० लाख रुपयांची नुकसान भरपाई मिळावी आणि आयलानेची एसआयटीकडून चौकशी व्हावी यासाठी संभाजीनगर उच्च न्यायालयामध्ये दाखल केलेली आहे. त्या याचिकेमध्ये सुद्धा खंडपीठाने पोलीस निरीक्षक नागनाथ आयलाने,पोलीस उपनिरीक्षक पाटील आणि महाराष्ट्र सरकारला नोटीस काढल्या आहेत असेही प्रा.धोडे यांनी सांगितले. कायद्याचे राज्य आहे. कायदा कुणाच्या बापाच्या घरचा नाही. त्यामुळे कायद्याचे उल्लंघन करून लाठीमार करणाऱ्यांना कायद्यानेच चाप बसविला आहे. माझ्या पत्नीचे निधन झाल्यानंतर मी दोन महिने सार्वजनिक जीवनापासून दूर होतो. आता मी पूर्वी प्रमाणे सक्रिय झालो आहे. पोलिस निरीक्षक नागनाथ आयलाने यांना कायदा काय असतो हे दाखविण्यासाठी माझ्यासारखा कार्यकर्ता तयार आहे, असे सेवा जनशक्ती पार्टीचे पक्षप्रमुख प्रा. मनोहर धोंडे यांनी सांगितले.

# संभाजी ब्रिगेडची कार्यकारणी जाहीर

**तभा वृत्तसेवा**
**देगलूर,दि. ०३ फेब्रुवारी**

दि. २ फेब्रुवारी रोजी शासकीय विश्राम गृह देगलूर येथे संभाजी ब्रिगेड पदाधिकारी नियुक्ती सोहळा संपन्न झाला यावेळी तालुकाध्यक्ष जेजेराव पाटील शिंदे यांच्या हस्ते विधानसभा उपाध्यक्ष पदी बालाजी पाटील हिंगोले कुशावाडीकर, तालुका उपाध्यक्ष पदी अमृत पाटील आलुरकर , संघटक पदी पूर्वीचे लातूर जिल्हा उपाध्यक्ष न्यानोबा पाटील शिंदे लोणीकर, विद्यार्थी आघाडी तालुकाध्यक्ष पदी साईनाथ कहाळेकर यांना नियुक्ती देऊन पुढील कार्यास शुभेच्छा देण्यात आल्या.

यावेळी तालुका अध्यक्ष जेजेराव पाटील शिंदे,सचिव देविदास थडके , शहराध्यक्ष डॉ. सुनील जाधव , सोशल मेडिया अध्यक्ष बाबाराव कदम आदी ची यावेळी उपस्थिती होती. सदरील कार्यक्रमाचे प्रास्ताविक जेजेराव पाटील यांनी केले सूत्रसंचालन डॉ. सुनील जाधव यांनी केले.तसेच देगलूर शहरातील या निवडीबद्दल प्रत्येक्ष अप्रत्येक्ष शुभेच्छा दिल्या.

# ईसापूर धरणाचे पाणी पैनगंगा नदीच्या पात्रामध्ये सोडण्यासंबंधात आमरण उपोषण

## ईसापूर धरणाचे ५ टि.एम.सी. पाणी डाव्या कालव्यामधून सोडा



**तभा वृत्तसेवा**
**इस्लापूर,दि. ०३ फेब्रुवारी**

ईसापुर प्रकल्पातून पैनगंगा नदी पात्रात पाणी सोडण्यात यावे, अशी मागणी या भागातील नागरिक सातत्याने करीत आहेत. पैनगंगा नदी काठावरील परोटी तांडा, परोटी, ईस्लापूर, वाळकी (बु.), रोडानाईक तांडा, नंदगांव, कोल्हारी, मुरली, परोटी वन, इरेगाव, सोनदाची, बोरीवन, मंगरुळ नंदगांव तांडा, सहस्त्रकुड येथील सर्व गावक-यांनी सर्व ग्रामपंचायत चे ठराव ठेवून वरिल संदर्भान्वये पैनगंगा पात्रात ईसापूर धरणाचे ५ टि.एम.सी. डावा कालव्यामधून पाणी सोडण्या संदर्भात विनंती अर्ज केले आहेत.

सदरील नदीलगत शेकडो गावे आहेत सदरील नदीच्या पाण्याच्या भरवश्यावर या गावाना पिण्यांच्या पाणी पुरवठा होतो. या वर्षी परतीच्या पावसाने दगा दिल्याने पैनगंगा नदीपात्रातील पाणी आटले आहे. तसेच डिसेंबर- जानेवारी या महिन्यात सहस्त्रकुंड पात्र कोरडे पडले आहे त्यामुळे जनावऱ्यांच्या व पिण्याच्या पाण्याचा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे.

जोपर्यंत ५ टिएम.सी. पाणी परोटी वन, परोटी, रिठा, नंदगांव पर्यंत येणार नाही तोपर्यंत आमरण उपोषण असेच चालू राहिल अशी माहिती उपोषण करत्यांनी दीली.

**सिआर-३६ अन्वये पत्र दिले होते**

त्यानुसार मा.अधीक्षक अभियंता. पाटबंधारे यांनी पाणी सोडले परंतु सदरील पाणी हे हिमायतनगर तालुक्यातील धानोरा या गावापर्यंतच आले आहे. परोटी वन, परोटी, रिटा, नंदगांव हया गावापर्यंत येणे अपेक्षीत होते. तसे झाले नाही.

# ४ फेब्रुवारीपासून जिल्ह्यात कर्करोग तपासणी व जनजागृती- डॉ. शेळके

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ३ फेब्रुवारी**

जिल्ह्यात ४ फेब्रुवारी ते २५ फेब्रुवारी या कालावधीत कर्करोग तपासणी आणि जनजागृती मोहीम राबविण्यात येणार असल्याची माहीती जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ कैलाश शेळके यांनी दिली आहे.

सध्या सर्व समाजामध्ये असंसर्गिक आजाराची झपाट्याने वाढ होतांना दिसून येते आहे आणी त्यामध्ये ६३ % मृत्यू असंसर्गिक आजाराने होताना दिसून येतात तसेच त्यामध्ये ९% मृत्यू हे फक्त कर्करोगाने होतात ग्लोबोकॅन २०२० च्या सर्वेक्षणानुसार प्रति एक लाख लोकसंख्येमागे मुखाचा कर्करोग प्रमाण २६.३ असून मृत्यूचे प्रमाण ८.७ आहे स्तनाचा कर्करोगाचे प्रमाण ७७.९ असून मृत्यूचे प्रमाण १०.७ आहे. गर्भाशयाचा कर्करोगाचे प्रमाण ५०.२ असून मृत्यूचे प्रमाण ८.७ आहे. अशा प्रकारे कर्करोगाचे प्रमाण समाजामध्ये अधिक आढळून येते त्यामुळे समाजामध्ये बदललेली जीवनशैली याला जबाबदार आहे त्यामुळे समाजामध्ये याविषयी जनजागृती करणे, आजाराविषयी माहिती देणे, शंकांचे निरसन करणे, जीवनशैली बदलायला मदत करणे, मार्गदर्शन करणे, कर्करोगाचे निदान लवकर होण्यासाठी वेळेत तपासणी करणे यासाठी समाजामध्ये जनजागृती करणे अत्यंत गरजेचे आहे कर्करोगाचे निदान हे लवकरात लवकर होणे गरजेचे असते त्यामुळे मृत्यू कमी होऊ शकतात यासाठी जिल्हाधिकारी अभिनव गोयल, मुख्य कार्यकारी अधिकारी श्रीमती नेहा भोसले यांच्या मार्गदर्शनानुसार जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ कैलास शेळके, व जिल्हा शल्यचिकित्सक डॉ नितीन तडस यांच्या पुढाकाराने हिंगोली जिल्ह्यामध्ये , प्राथमिक आरोग्य केंद्र, आरोग्य उपकेंद्र, ग्रामीण रुग्णालय, उपजिल्हा रुग्णालय, जिल्हा रुग्णालय या सर्व आरोग्य संस्थांच्या मदतीने, तसेच इंडियन मेडिकल असोसिएशन, खाजगी डॉक्टर संघटना, तसेच वैद्यकीय अधिकारी संघटना व त्यांचे पदाधिकारी यांच्या सहभागाने समाजामध्ये मोठ्या प्रमाणावर जनजागृती करण्यात येऊन रुग्णांचा शोध घेतला जाणार आहे, तसेच त्यांना उपचार करण्यात येणार आहे त्यासाठी सूक्ष्म वेळापत्रक तयार करण्यात आले असून आरोग्य संस्थेतील कर्मचारी अधिकारी यांची यासाठी निर्धारित वेळेची व कामाची जबाबदारी निश्चित करण्यात आली आहे. यामध्ये जिल्हास्तरावर टास्क फोर्स स्थापन करण्यात आला असून जिल्हास्तरावरून या कार्यक्रमाचे सनियंत्रण केले जाणार आहे. या मोहिमेमध्ये तीस वर्षावरील व्यक्तींचे मौखिक, स्तन व गर्भाशय मुख तपासणी करण्यात येणार आहे, जिल्हा पातळीवर जिल्हा शल्य चिकित्सक,व ग्रामीण भागात जिल्हा आरोग्य अधिकारी, तालुका आरोग्य अधिकारी यांच्या समन्वयाने ही मोहीम राबवण्यात येणार आहे यासाठी विविध माध्यमांचा वापर केला जाणार आहे, यामध्ये पोस्टर प्रदर्शन, रॅली, पोस्टर, बॅनर,होल्डिंग, चित्रफिती, रेडिओ जिंगल, टीव्ही स्पॉट, बस स्थानक रेल्वे स्टेशन या ठिकाणी अनाउन्समेंट यासारख्या विविध माध्यमांचा वापर करून, समाजामध्ये चांगल्या प्रकारे जनजागृती करण्यात येईल, हे अभियान ४ ते २५ फेब्रुवारी २०२५ पर्यंत राबवण्यात येणार असून त्याचे मुख्य उद्घाटन राज्य स्तरावरून होणार असून राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवी यांचे मार्फत दिनांक ४ फेब्रुवारी २०२५ रोजी यशवंतराव चव्हाण सभागृह मुंबई येथून होणार आहे, तसेच जिल्हास्तरावर उद्घाटन होऊन दिनांक ४ ते ८ या कालावधीमध्ये कर्करोगाचे निदान झालेल्या रुग्णांना त्यांच्या गरजेनुसार त्यांना मोफत उपचार करण्यात येणार आहे दिनांक ९ ते १६ या कालावधीमध्ये सर्व आरोग्य विभागाच्या संस्थेमध्ये व गृहपातळीवर संशयित रुग्णांचा शोध घेतला जाणार आहे. त्यांची तपासणी करण्यात येणार आहे. १७ ते २४ या कालावधीमध्ये कर्करोगांच्या रुग्णांना जिल्हास्तरावर गरजेनुसार मोफत उपचार करण्यात येतील २५ फेब्रुवारी पुढील काळात गरजेनुसार कर्करोग निदान झालेल्या रुग्णांना संदर्भ सेवा देण्यात येईल. कर्करोगाबाबत लवकर निदान होणेसाठी समाजातील सर्व घटकांनी अत्यंत चांगल्या प्रकारे या कार्यकाळात आपल्या नजीकच्या सरकारी दवाखाने, रुग्णालयात जाऊन, या आजाराविषयी निदान करून घ्यावे व विनामूल्य उपचाराचा लाभ घ्यावा असे आवाहन जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. कैलास शेळके व जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. नितिन तडस व या कार्यक्रमाचे नोडल अधिकारी डॉ. पांडुरंग फोपसे व डॉ. एस. शैलजा कुप्पास्वामी यांनी केले आहे.

## सांदीपनी पब्लीक स्कूलमध्ये वार्षिक स्नेहसंमेलन उत्साहात साजरे



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ३ फेब्रुवारी**

सांदिपनी पब्लिक स्कूल, सुनील नगर, तरोडा (बु), नांदेड येथे वार्षिक स्नेहसंमेलन मोठ्या उत्साहात संपन्न झाला कार्यक्रमाच्या प्रमुख पाहुण्या प्राथमिक शिक्षणाधिकारी सविता बिर्गे यांच्या हस्ते दीप प्रज्वलन करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. प्रमुख पाहुण्यांचे शाल श्रीफळ देऊन स्वागत करण्यात आले. कार्यक्रमाची सुरुवात ही स्वागत गीताने झाली.

शाळेच्या मुख्याध्यापिका क्रांती कुलकर्णी यांनी प्रास्ताविक करून संपूर्ण कार्यक्रमाची रूपरेषा येणाऱ्या शैक्षणिक वर्षाचे नवीन धोरण याची मांडली. कार्यक्रमाच्या अध्यक्ष सविता बिर्गे यांनी भाषणात मुलांच्या कलागुणांना व आत्मविश्वासाला वाव देण्यासाठी अशा कार्यक्रमांची ज्यात विद्यार्थ्यांच्या सुप्त कला गुणांना वाव मिळेल गरज असल्याचे सांगितले. त्यांनी शाळेच्या भव्यदिव्य कार्यक्रम पाहून आनंद व्यक्त केला. कार्यक्रमात अनेक विद्यार्थ्यांनी विविध वेशभूषेत नृत्य सादर केले. शिवचरित्र, कृष्ण लीला, रामायण, गणेश वंदना, भगतसिंग, रतन टाटा, सिंधुताई सपकाळ अशा विविध विषयांवर आधारित नृत्यांनी प्रेक्षकांची मने जिंकली. प्रेक्षकांनीही विद्यार्थ्यांच्या कलागुणांना भरभरून दाद दिली.

या कार्यक्रमाला संचालक सुनील राठोड, विपुल राठोड, मुकूल राठोड, सौ रेश्मा विपुल राठोड, सौ माहेश्वरी मुकुल राठोड, मुख्याध्यापिका क्रांती कुलकर्णी, उपमुख्याध्यापिका हरप्रीत कौर, इंग्रजी माध्यमिक शाळा संघाचे अध्यक्ष जितेंद्र सिंह पहाडिया, लक्ष्मण जाधव, भरत होकर्णे, शंतनू कैलासे, गोविंद केंद्रे, प्राचार्य के.हरिबाबु महेश कुंटूरकर, रातोळीकर, सुहास पाटील टाकळीकर, पी आय बोरगांवकर, माजी नगरसेवक बाळासाहेब देशमुख यांच्यासह मान्यवरांची उपस्थिती होती. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन जयदीप पवळे, अनुश वानखेडे, अनुष्का सोनकांबळे, समृद्धी गायकवाड, मनीषा काकडे, संचिता देशमुख, धनश्री कोकाटे, सोनाक्षी राठोड, सौख्य पालमकर, श्रावणी गाडगीळ यांनी केले. कार्यक्रमाची सांगता राष्ट्रगीताने झाली.

## हिंगोलीत भारतीय जैन संघटनेच्यावतीने मोफत कॅन्सर तपासणी शिबीर

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ३ फेब्रुवारी**



भारतीय जैन संघटना हिंगोली जिल्ह्याच्या वतीने जागतिक कॅन्सर दिनानिमित्त मोफत कॅन्सर तपासणी शिबिराचे आयोजन श्री शांतिनाथ श्वेतांबर जैन मंदिर उपाश्रय पोस्ट ऑफिस रोड येथे करण्यात आले होते.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी इंदरचंद सोनी हे होते. डॉ.शैलेश अग्रवाल, डॉ.अनुप तोष्णीवाल, डॉ. विद्या एकलारे, डॉ. श्रुती तोष्णीवाल, डॉ. प्रीती कदम डॉ. स्वाती निलेश गुंडेवार, डॉ. नेहा अग्रवाल मित्तल, डॉ. रुपाली साकळे, डॉ. सोनाली दमकोंडावार, डॉ. सौ. टेहरे, डॉ. विद्याताई बांगर आदींची प्रमुख उपस्थिती होती. सुत्रसंचालन डॉ. प्रेमेंद्र बोथरा यांनी केले. जागतिक कॅन्सर दिनानिमित्त मोफत कॅन्सर तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिरात पुरूष व महिलांकरता स्तन व गर्भाशयाच्या तसेच सर्व प्रकारच्या कॅन्सरची मोफत तपासणी करण्यात आली. कॅन्सर संदर्भात सर्वसामान्य नागरिकांना माहिती देऊन एक जागृतीचा संदेश देण्यात आलेला आहे. कॅन्सर संदर्भात आपल्याला काहीही समस्या निर्माण झालीच डॉक्टरांना त्वरित संपर्क साधून त्यावर योग्य उपचार करून घ्यावा असाही सल्ला यावेळी तज्ज्ञ डॉक्टरांनी दिला. आणि मनातील भीती काढून टाकावी जेणेकरून आपलं आरोग्य अजून तंदुरुस्त होईल आणि आपण सुरक्षित जीवन जगू. कॅन्सर हा उपचारातून बरा होणारा रोग आहे त्यामुळे कोणीही कॅन्सरला घाबरून जाऊ नये.

मोफत कॅन्सर तपासणी शिबिरात सकाळी १०.३० ते. ३ वाजे पर्यंत १५० लोकांनी नाव नोंदणी केली होती. कार्यक्रमासाठी मुख्य सहयोगी म्हणून इंदरचंद प्रेमराज सोनी, सुभाषचंद प्रेमराज सोनी, नाभीराज पारसोबा मास्ट, राजकुमार वीरूमल चंदनानी, सुधाकर भानुसा साकळे, नेमिचंद नवीन कुमार सोनी, विनोदकुमार हिरालाल मुथा, महावीरचंद शांतीलाल बडजाते, आणि गुप्त दाता. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी प्रकाशचंद सोनी, विकी गोरे, कुलदिप मास्ट, डॉ.नितीन साकळे, नरेंद्र सोनी, प्रविण सोनी, निरज सोनी, दिनेश मुथा, आशिष राखे, रमेशचंद सोनी, प्रतिक बोरा, डॉ.विमल बोरा, डॉ. अमित शहा, डॉ.रामकृष्ण महल्ले, ऋषभ छाजेड आदींनी परिश्रम घेतले.



**हिंगोली- येथील जिल्हा परिषदेते सात कलमी कार्यक्रमांतर्गत स्वच्छता मोहीम राबविण्यात आली. यावेळी मुख्य कार्यकारी अधिकारी नेहा भोसले, प्रकल्प संचालक नामदेव केंद्रे, उपमुख्यकार्यकारी अधिकारी अनंतकुमार कुंभार, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ कैलाश शेळके, समाज कल्याण अधिकारी राजू एडके यांच्यासह अधिकारी, कर्मचारी यांनी सहभाग घेतला. छाया- विजय गुंडेकर**

## संक्षिप्त वृत्त

### रस्त्यावरच अवैध वाळुसाठा फेकून पसार



हिंगोली- सेनगाव-हिंगोली रस्त्यावर एका टिप्परमधून अवैध वाळू वाहतुक होत असल्याचे लक्षात आल्यानंतर महसूल पथकाने या टिप्परचा पाठलाग केला परंतु टिप्पर चालकाने येथील महामार्गावर चक्क वाळू फेकून पोबारा केला. रस्त्यावरच वाळूचा ढीग पडल्यामुळे या रस्त्यावर वाहतुकीला अडथळा निर्माण होत आहे. महसूल व पोलिस प्रशासनाला झुंगारा देऊन टिप्पर चालक रस्त्यावर वाळू टाकून पसार कसा झाला हा संशोधनाचा विषय असून याबाबत उलटसुलट चर्चा होत आहे.

### प्रणव मगर बुध्दीबळ स्पर्धेत प्रथम



वसमत- शहरातील बहिर्जी इंटरनॅशनल इंग्लीश स्कूलमध्ये प्रजासत्ताक दिनानिमित्त विविध शालेश स्पर्धाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी बुध्दीबळ स्पर्धेत प्रणव मगर प्रथम, द्वितीय अब्दुल अजीज शेख इलियास, तृतीय आशुतोष पडोळे यांनी क्रमांक पटकाविला. या विद्यार्थ्यांना पारितोषिक वितरीत करून गौरविण्यात आले.



हिंगोली- येथील प्रजापती ब्रम्हकुमारी ईश्वरी विद्यालयात हळदी कुंकवाचा कार्यक्रम आयोजीत करण्यात आला होता. संचालीका ब्रम्हकुमारी अरूणा दिदी यांनी मार्गदर्शन केले. यावेळी मोठ्या संख्येने महिला सहभागी झाल्या. छाया- सुनील पाठक

## ग्रेन मर्चंट असोसिएशन व कृषी उत्पन्न बाजार समितीतर्फे क्रिकेट सामने



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ३ फेब्रुवारी**

ग्रेन मर्चंट असोसिएशन व कृषी उत्पन्न बाजार समिती हिंगोली यांच्या वतीने मोंढा प्रीमियर क्रिकेटचे लिग सीज़न ३ सामने आयोजित करण्यात आले होते. या क्रिकेट सामन्याचे उद्घाटन भाजपचे प्रदेश उपाध्यक्ष व माजी आमदार गजाननराव घुगे व संचालक अशोक मूंदड़ा यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी ज्येष्ठ व्यापारी राम कयाल, ॲड अजय उर्फ बंटी देशमुख, मनमोहन सोनी, रमेशचंद सोनी, प्रकाशचंद्र सोमाणी, रमेशचंद्र चांडक, ज्ञानेश्वर मामडे, मुरलीधर पांडे, गोल्डी सोनी, सुदर्शन कंदी, कमल बगडिया व इतर व्यापारी हजर होते.

येथील मैदानावर अतिशय खेळीमेळीच्या वातावरणात हे सामने सुरू असून यामध्ये व्यापारी, आडते, मापारी, हमाल यांनी उत्स्फूर्तपणे सहभाग घेतला आहे. दिवसभर मोंढ्यात कामाच्या तणावापासून उसंत मिळावी यासाठी या सामन्यांचे आयोजन करण्यात आले आहे. सामन्यांचे आयोजक राहुल सोनी, सुमित चांडक, किसन सोमानी व ग्रेन मर्चंट असोसिएशन व कृषी उत्पन्न बाजार समिती हिंगोलीच्या वतीने दरवर्षी प्रीमियर लीग क्रिकेटचे आयोजन करण्यात येत असते. यावर्षी ही क्रिकेट मॅचचे आयोजन करण्यात आले असून या सामन्यांसाठी एकूण १२ संघ सहभागी झाले आहेत, अशी माहिती शिवशंकर घुगे यांनी दिली.

## मराठी पत्रकार संघाच्या जिल्हाध्यक्षपदी प्रद्युम्न गिरीकर, सचिवपदी संतोष भिसे



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ३ फेब्रुवारी**

येथील शासकीय विश्रामगृहावर मराठी पत्रकार संघाची बैठक घेण्यात आली. मराठी पत्रकार संघाचे प्रदेशाध्यक्ष किरण जोशी व प्रदेश संघटक संदीप पारोळकर यांच्या आदेशाने जिल्हा कार्यकारिणी जाहीर करण्यात आली.

सदरील बैठकीला संघटनेचे जेष्ठ सदस्य विजय कुलदीपके यांची प्रमुख उपस्थिती होती. सदरील बैठकीत सर्वानुमते पुढील कार्यकारणी जाहीर करण्यात आली. यावेळी विजय कुलदीपके यांच्या हस्ते नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांचा सत्कार करण्यात आला. जिल्हा अध्यक्ष- प्रद्युम्न गिरीकर, कार्याध्यक्ष-मदन शेळके, सरचिटणीस- संतोष भिसे, सह सरचिटणीस- मनीष खरात, जिल्हा उपाध्यक्ष- अशोक गुंडाळे, बालाजी गिरी हिंगोली, बबन सुतार, सेनगाव, दत्तात्रय शेगुकर औंढा नागनाथ, हफिज बागवान, संपर्कप्रमुख- उमेश चक्कर, जिल्हा संघटक बाबुराव ढोकणे, प्रसिद्धीप्रमुख- चंद्रकांत वैद्य, कोषाध्यक्ष- गजानन मगर, सह संघटक- श्याम शेवाळकर, सल्लागार विलास जोशी, हरपाल सेठी, रमेश आढळकर, नामदेव नागरे, जिल्हा कार्यकारणी सदस्य महावीर आदमाने, जगन्नाथ पुरी, शेख हबीब, फारुख शेख, राजू गवळी, सुनील पाठक, ज्ञानेश्वर चव्हाण, नामदेव कापसे, संतोष जयस्वाल, राजेंद्र हलवाई यांची निवड करण्यात आली.

## वसमत जवाहर नवोदय विद्यालयात वार्षिकोत्सव साजरा

**तभा वृत्तसेवा**
**वसमत, ३ फेब्रुवारी**




येथील जवाहर नवोदय विद्यालय हिंगोलीचा वार्षिकोत्सव मोठ्या उत्साहात व थाटामाटात संपन्न झाला. याप्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून वसमत विधानसभा मतदारसंघाचे आमदार राजू भैया नवघरे उपस्थित होते.

कार्यक्रमाची सुरुवात संत नामदेव यांच्या प्रतिमा पूजनाने झाली. या प्रसंगी विद्यालयाचे प्राचार्य श्री. एस. जे.गवई यांनी प्रमुख पाहुण्यांचे व मान्यवरांचे स्वागत केले. विद्यालयाचे वरिष्ठ शिक्षक के. आर. गायकवाड यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले. सदर कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी विविध विषयांवर विविध प्रकारचे कार्यक्रम उत्कृष्टरित्या सादर केले यामध्ये नृत्य,नाटक, कव्वाली, योगा, मूकनाट्य, लावणी अशा विविध विषयांबरोबरच देशभक्तीपर नृत्य व गीतेही विद्यार्थ्यांनी सादर केली व उपस्थितांना मंत्रमुग्ध केले. या प्रसंगी बोलताना आमदार राजू भैया नवघरे यांनी विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या सर्व कार्यक्रमांचे, विद्यार्थ्यांचे व सर्व शिक्षकवर्गाचे मनापासून कौतुक करून सर्वांच्या पाठीवर शाबासकीची थाप दिली. नवोदय विद्यालय ही संस्था या पुढेही केवळ शैक्षणिकच नव्हे तर विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाला पोषक अशा कार्यक्रमांवर भविष्यातही भर देईल व विद्यालयाचा नावलौकिक निश्चितच वाढवेल अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली. अतिशय सुंदर, शिस्तबद्ध, नियोजनबद्ध असा हा सोहळा पाहून बहुसंख्येने उपस्थित पालकवर्ग ही मंत्रमुग्ध झाला. या प्रसंगी विविध नवोदय विद्यालयाचे विविध उच्च पदांवर कार्यरत अनेक माजी विद्यार्थी ही उपस्थित होते. माजी विद्यार्थ्यांच्या वतीने यावेळी विद्यालयाचे प्राचार्य एस. जे. गवई यांचाही सत्कार करण्यात आला. विद्यालयाच्या सांस्कृतिक कार्यक्रम प्रभारी सौ. शंकरी सरकार, संगीत शिक्षिका हेमलता इंगळे, कला शिक्षिका डॉ. ममता शाक्य व सर्वच शिक्षकांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. विद्यालयाचे विद्यार्थी मंथन वाकोडे, आदित्य चौधरी, कु. श्रुती गुथे व कु. विदाक्षी आंभोरे यांनी संपूर्ण कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले तर विद्यालयाचे मराठी शिक्षक एस.एस. घटकांबळे यांनी सर्वांचे आभार मानले व या दिमाखदार सोहळ्याची सांगता झाली.

## जि प मध्ये स्वच्छता मोहीम

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १ फेब्रुवारी**

येथील जिल्हा परिषद परिसरात दि २ फेब्रुवारी रोजी अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी स्वच्छता मोहीम राबवली. जिल्हा परिषद परिसर आणि कार्यालयातील कचरा एकत्र करून त्याची विल्हेवाट लावण्यात आली. या अभियानात मुख्य कार्यकारी अधिकारी नेहा भोसले, उपमुख्य कार्यकारी अधिकारी अनंतकुमार कुंभार, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ कैलाश शेळके, समाज कल्याण अधिकारी राजू ऐडके, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेचे प्रकल्प संचालक नामदेव केंद्रे यांच्यासह अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते.

सोलापूर तरुण भारत

www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

## संक्षिप्त वृत्त...

### शारदा महाविद्यालयात अभासी अध्ययन केंद्राचे स्वागत

**परभणी,/प्रतिनिधी :** नाशिक येथील यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाच्या नांदेड विभागीय केंद्राच्यावतीने शाळा संपर्क अभियान व वाचन संकल्प महाराष्ट्राचा अंतर्गत कार्यक्रमासाठी अभासी अध्यायनकेंद्र रथाचे शारदा विद्यालय व महाविद्यालयात अ… न झाले.

यावेळी शारदा महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. बबन पवार, उपप्राचार्य डॉ. शामसुंदर वाघमारे, डॉ. प्रशांत मेने व डॉ. एन.व्ही. सिंगापुरे यांनी या अभासी अध्यायन केंद्र रथाचे स्वागत केले. हे अभियान नांदेड येथील यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ विभागीय केंद्राचे वरिष्ठ शैक्षणिक सल्लागार डॉ. यशवंत कलेपवार व डॉ. चंद्रकांत सातपुते यांच्या मार्गदर्शनाखाली घेण्यात आले. यावेळी महारष्ट्र शासनाच्या शाळा संपर्क अभियान व वाचन संकल्प महाराष्ट्राचा कार्यक्रमाची माहिती अभासी अध्ययन रथ केंद्राद्वारे विद्यार्थ्यांना देण्यात आली. यावेळी दादाराव मुंढे, वाहक शिंदे, कार्यक्रम समन्वयक डॉ. अविनाश पांचाळ, डॉ. आर. पी. देशपांडे, डॉ. नुरुल आमीन, डॉ. गोपाल पेदापल्ली, सुरेश जयपुरकर, रमेश जाधव, पवार तुकाराम व असंख्य विद्यार्थी उपस्थित होते.

### होळकर महाविद्यालयात आज महोत्सव

**परभणी,/प्रतिनिधी :** पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शिक्षणसंस्थेच्या संयुक्त विद्यमाने राणीसावरगाव येथील पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर महाविद्यालयात १ फेब्रुवारी रोजी सकाळी १० वाजता कर्मयोगी प्राचार्य डॉ. शिवाजीराव दळणर विद्यार्थी महोत्सव २०२५ चे आयोजन करण्यात आले आहे.

या कार्यक्रमाचे उद्घाटन गंगाखेड विधानसभेचे आमदार डॉ. रत्नाकर गुट्टे यांच्याहस्ते व पाथरी विधानसभेचे आमदार राजेश विटेक यांच्या प्रमुख उपस्थितीत होणार आहे. यावेळी अध्यक्ष म्हणून ज्येष्ठ विधीतज्ज्ञ ॲड. शिवाजीराव हाके तर प्रमुख उपस्थिती सहाय्यक पोलीस निरीक्षक दिनेश सूर्यवंशी, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शिक्षणसंस्थेचे सचिव कृष्णा शिवाजीराव दळणर, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. कांतराव पोले यांची उपस्थिती राहणार आहे. यावेळी विविध स्पर्धेतील विजेत्यांचा सत्कार व शाळा , कनिष्ठ महाविद्यालय, वरिष्ठ महाविद्यालयीन विद्यार्थ्यांच्या विविध कला गुणांच्या प्रकारचे सादरीकरण होणार आहे. या वार्षिक महोत्सवाला जास्तीत जास्त विद्यार्थ्यांनी आणि पालकांनी उपस्थित रहावे, असे आव्हान सांस्कृतिक विभागाच्या वतीने करण्यात आले आहे.

### उती संवर्धन प्रकल्पास कुलगुरू डॉ. इन्द्र मणि यांची भेट

**परभणी,/प्रतिनिधी :** वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठातील उती संवर्धन प्रकल्प येथे निर्माण करण्यात येणाऱ्या उती संवर्धित केळी रोपांच्या प्रगतीचा आढावा घेण्यासाठी कुलगुरू डॉ. इन्द्र मणि यांनी २७ जानेवारी रोजी प्रयोगशाळेला भेट दिली.

या प्रसंगी विद्यापीठाचे शिक्षण संचालक डॉ. भगवान आसेवार, प्रभारी अधिकारी डॉ. आनंद दौंडे, वरिष्ठ संशोधन अधिकारी श्री. आर. एन. वाडीकर आणि श्री. उ. के. सुतार हे उपस्थित होते. भेटीदरम्यान कुलगुरू डॉ. इन्द्र मणि यांनी उती संवर्धित केळी रोपांच्या विविध अवस्थांची सखोल पाहणी केली. त्यांनी प्रयोगशाळेत चालणाऱ्या संशोधन प्रक्रियांची बारकाईने माहिती घेतली आणि रोपांच्या उत्पादन क्षमता वाढविण्यासाठी काही आवश्यक सुधारणा सुचविल्या. कुलगुरूंच्या मार्गदर्शनामुळे प्रकल्पाच्या कार्यक्षमतेत लक्षणीय सुधारणा होईल, असा विश्वास प्रभारी अधिकाऱ्यांनी व्यक्त केला.

### एचएआरसी संस्थे तर्फे पुस्तकांची ''आनंदी वाचनपेटी भेट

### वालूर जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक कन्या शाळेत उपक्रम

**परभणी,/प्रतिनिधी :** होमिओपॅथिक अकॅडमी ऑफ रिसर्च ॲन्ड चॅरिटीज (एचएआरसी) संस्थेच्या वतीने शनिवार २५ जानेवारी रोजी सेलू तालुक्यातील वालूर जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक कन्या शाळेस 'आनंदी वाचनपेटी' भेट देण्यात आली.

यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून एचएआरसी संस्थेचे अध्यक्ष डॉ.पवन चांडक, कवी शरद ठाकर, मुख्याध्यापक षडानंद देशमाने हे उपस्थित होते. या आनंदी वाचन पेटीमध्ये १२५ बालसाहित्याचा खजिना असून यामध्ये कथासंग्रह, कवितासंग्रह, महापुरुषांची चरित्रे, शास्त्रज्ञांची चरित्रे उपलब्ध करून देण्यात आली आहेत. विशेष म्हणजे मराठी, हिंदी व इंग्रजी तिन्ही भाषेत हे साहित्य आहे.

संस्थेचे अध्यक्ष डॉ. चांडक यांनी, विद्यार्थ्यांना चांगले व्यक्तिमत्त्व व चरित्र घडविण्यासाठी ३० चांगल्या सवयींचा अंगीकार करून जीवन समृद्ध करावे, तसेच दररोज एक तास सहकुटुंब वाचन करावे, वाचलेले लिहिण्याचे व व्यक्त करण्याचे तसेच लेखकांना पत्र लिहिण्याचे आवाहन केले. या प्रसंगी शाळेतील शिक्षक धरणे, गायकवाड, गिल्डा, घुगे, जोशी, नाना पवार, राठोड, अतुल पवार, शिक्षिका आल्दे, कंधारकर, मोरे, सूर्यवंशी, शिक्षिका साक्षी आदी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन राठोड तर आभार प्रदर्शन किरण गिल्डा यांनी केले.

### बाहेतीची राज्य टेबल टेनिस संघात निवड

**परभणी,/प्रतिनिधी :** परभणी जिल्हा टेबल टेनिस असोसिएशनची खेळाडू आद्या महेश बाहेती हिची महाराष्ट्र संघात ८६ वी कॅडेट सब जुनिअर राष्ट्रीय टेबल टेनिस क्रीडा स्पर्धेसाठी निवड झाली आहे.

३० जानेवारी ते ७ फेब्रुवारी दरम्यान अभय प्रशाल इनडोअर स्टेडियम इंदौर (मध्य प्रदेश) येथे या स्पर्धा होणार आहेत. या स्पर्धेसाठी महाराष्ट्रातून २० जणांचा संघ जाहीर झाला असून यामध्ये अकरा वर्षे मुलींच्या गटात परभणीच्या आद्या पूजा महेश बाहेती हिची निवड झालेली आहे. आद्या सलग तीसऱ्या वर्षी राष्ट्रीय अजिंक्यपद स्पर्धेमध्ये महाराष्ट्र संघाचे नेतृत्व करणार आहे. यापुर्वी चार वेळेस राज्य अजिंक्यपद पटकावले आहे. आद्या ला टेबल टेनिस क्रीडा मार्गदर्शक चेतन मुक्तावार यांचे मार्गदर्शन लाभले.

तरुण भारत

कार्यालयाचा पत्ता- डॉ.लोया नेत्र रुग्णालयासमोर ढवळे यांचे निवासस्थान शिवाजी नगर, परभणी

❑ दैनिक ❑ वेबसाईट ❑ सोशल मिडिया

छोट्या जाहीराती व प्रगटनासाठी

खरेदी-विक्री-प्रॉपर्टी व वाहन/भाडेपट्टी/नोकरी विषयक/ प्रवेश/ विवाह विषयक/ शैक्षणिक/ आरोग्य/ ड्रायव्हिंग स्कूल/ मोबाईल/ हॉटेल/ रेस्टॉरंट/ आईस्क्रिम पार्लर/ मसाज पार्लर/ ब्युटी पार्लर/ कागदपत्रे हरवले/ चेंज ऑफ नेम/ न्यायालयीन व धर्मादाय आयुक्त कार्यालय प्रगटने/

९४ २३३२४६६६५, ९२८४६६४४३०, ९२८४६९५५८३

# जायकवाडीचे पाणी मिळेना;पिके करपू लागली शिवसेना उबाठाचे उपजिल्हा प्रमुख धर्मे यांचा आत्मदहनाचा इशारा

**पाथरी ,/प्रतिनिधी-:** तालुक्यातील जवळपास विस गावे ओलीता खाली येत असलेल्या बी ५९ या चारीवरील काही गावांना या पुर्वी डिसेंबर मधील आणि आता जानेवारी महिण्यातील पाणी पाळी मिळाली नसल्याने गहू,हरबरा, ऊस ही पिके वाळत असून १ फ ेब्रुवारी पर्यंत पाणी पाळी नाही दिल्यास येथील जायकवाडीच्या उपविभागिय कार्यालया समोर आत्मदहन करण्याचा इशारा शिवसेना उबाठा चे उपजिल्हा प्रमुख रविंद्र धर्मे यांनी गुरुवार ३० जानेवारी रोजी निवेदना व्दारे येथील जायकवाडी उपविभागाच्या उपविभागिय अभियंत्यांना दिले आहे.



जायकवाडी पाण्याचे दुसरे आवर्तन चालु झाले असतांना देखील बी-५९ लिंबा वितरीकेला अद्याप पर्यंत पाणी सोडण्यात आलेले नाही. पहिले आवर्तन देखील या वितरीकेवरील लोणी, कानसुर, लिंबा या गावातील शेतकऱ्यांना न मिळाल्यामुळे त्यांच्या पिकाचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. सध्या दुसरे आवर्तन सुरु असतांना मागील १५ दिवसापासून वरील गावातील शेतकऱ्यांना अद्याप पर्यंत पाणी मिळत नाही. त्यामुळे सदरील शेतकऱ्याचे जायकवाडी पाण्याच्या भरावशावर पेरणी करण्यात आलेला गहू,हरबरा, ऊस आदी पिके पाण्या अभावी करपत आहेत. आपणास वारंवार विनंती करुन देखील आपण याची दखल न घेतल्यामुळे शेतकरी हवालदिल झाला आहे.

आपण दिनांक ०१ फेब्रुवारी २०२५ च्या आत बी-५९ लिंबा वितरीकेला पाणी न सोडल्यास दि. १ फेब्रुवारी वार शनिवार या दिवशी शेतकऱ्यांच्या हितासाठी मी आपल्या कार्यालया समोर आत्मदहन करणार आहे. याची गंभीर दखल घेऊन योग्य ती कार्यवाही करावी अन्यथा माझ्या जीवीतास काही धोका झालयास त्याची सर्वस्वी जबाबदारी आपल्यावर व आपल्या कार्यालयावर राहील.असे निवेदन रविंद्र धर्मे यांनी दिले आहे.

### सेलूत उद्या होणाऱ्या पत्रकार मेळाव्यास उपस्थित रहावे- दिपके

**परभणी,/प्रतिनिधी-** सेलू येथे राज्यस्तरीय आदर्श जिल्हा पत्रकार संघ व आदर्श तालुका पत्रकार संघ पुरस्कार वितरण सोहळा आणि तालुकाध्यक्षांचा मेळावा शनिवार १ फेब्रुवारी रोजी आयोजित करण्यात आला आहे. या मेळाव्याचे उदघाटन पालकमंत्री मेघना बोर्डीकर यांच्याहस्ते होणार असून प्रमुख पाहूणे म्हणून ना. संजय शिरसाठ हे उपस्थित राहणार आहेत. अध्यक्षस्थानी पत्रकार परिषदेचे मुख्य विश्वस्त एस.एम. देशमुख हे राहणार आहेत. स्वागताध्यक्ष म्हणून माजी नगराध्यक्ष विनोद बोराडे हे उपस्थित राहणार आहेत. या कार्यक्रमातच पत्रकारितेत योगदान देणाऱ्या पत्रकारांचा विशेष सन्मान करण्यता येणार असून या कार्यक्रमास जिल्हाभरातील पत्रकारांनी मोठ्या संख्येने उपस्थित रहावे असे आवाहन परभणी जिल्हा पत्रकार संघाचे अध्यक्ष प्रभू दिपके यांच्यासह कार्याध्यक्ष लक्ष्मन मानोलीकर व सर्व पदाधिकाऱ्यांनी केले आहे.

सेलूच्या साई नाट्यगृहामध्ये १ फेब्रुवारी रोजी सकाळी ९.३० वाजता आयोजित केलेल्या या कार्यक्रमाची जय्यत तयारी करण्यात आली असून यासाठी परिषदेच्या पदाधिकाऱ्यांसह जिल्हा पत्रकार संघ व सेलू तलुाका पत्रकार रसंघाचे पदाधिकारी परिश्रम घेत आहेत. या कार्यक्रमात रंगाअण्णा वैद्य आदर्श जिल्हा व वसंतराव काणे आदर्श तालुका पत्रकार संघांना पुरस्कार देवून सन्मानित करण्यात येणार आहेत. त्याच बरोबर राज्यभरातल्या तालुकाध्यक्षांचा मेळावाही संपन्न होणार आहे. मेळाव्यासाठी प्रमुख अतिथी म्हणून सामाजिक न्यायमंत्री संजय शिरसाठ, उदघाटक पालकमंत्री मेघना बोर्डीकर तर अध्यक्षस्थानी परिषदेचे मुख्य विश्वस्त एस.एम. देशमुख हे असणार आहेत. या सोहळ्यात न्यूज १८ लोकमतचे अँकर व प्रोड्युसर विशाल परदेशी यांचे व्याख्यान होणार असून प्रमुख पाहूणे म्हणून विश्वस्त किरण नाईक, शरद पाबळे, परिषदेचे अध्यक्ष मिलींद अष्टीवकर, यांच्यासह स्वागताध्यक्ष माजी नगराध्यक्ष विनोद बोराडेय यांची उपस्थित राहणार आहे.

तसेच आमदार राजेश विटेकर, माजी आमदार हरिभाउ लहाने, माजी आमदार विजय भांबळे, साईबाबा बँकेचे अध्यक्ष हेमंतराव आडळकर, डॉ. संजय रोडगे, अशोक काकडे, नंदकिशोर बाहेती, जयप्रकाश बिहाणी, शेख राज याचीं उपस्थिती राहणार आहे. याच सोहळ्यात पत्रकारितेत योगदान देणारे ज्येष्ठ साहित्यीक तथा पत्रकार डॉ. आसाराम लोमटे, डी.व्ही. मुळे व कांचन कोरडे यांचा विशेष सत्कार करण्यात येणार आहे.

## एकलव्य विद्यालयात वार्षिक स्नेह संमेलन सांस्कृतिक कार्यक्रम उत्साहात संपन्न





**जिंतूर,/प्रतिनिधी-** एकलव्य विद्यालयात वार्षिक स्नेहसंमेल निमित्त सांस्कृतिक कार्यक्रम उद्घाटन सोहळा संपन्न झाला. या अंतर्गत दि.२८ ते २९ दोन दिवशी विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले.

या दोन दिवशीय कार्यक्रमासाठी व्यासपीठावर अध्यक्षस्थानी विद्यालयाचे मुख्याध्यापक मा.श्री गीते श्रीहरी सर व श्री.सुरेश कापूरे सर तर प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित संस्थेचे सहसचिव तथा विद्यालयाचे प्रशासकीय अधिकारी मा. श्री.गोविंदराव लहाने सर, श्री त्र्यंबक पोले साहेब (गटशिक्षण अधिकारी जिंतूर) श्री मारुती घुगे (केंद्र प्रमुख,जिंतूर)दैनिक सकाळचे पत्रकार राजाभाऊ नगरकर मामा, दै. देशोन्नती चे पत्रकार मा. शहजाद भाई पठाण, दैनिक गावाला पत्रकार मा.निषाद अहमद, संस्थेचे सदस्या श्री चंद्रशेखर लहाने, श्री रामचंद्र बिरगड, श्री कृष्णा राठोड, श्री गजानन आघाव, श्री ज्ञानेश्वर महाराज मुंडे, श्री राजू चव्हाण, श्री आकाश राठोडआदी मान्यवर उपस्थित होते.

प्रथमतः व्यासपीठावर उपस्थित मान्यवरांच्या हस्ते सरस्वती पूजन व संस्थेचे संस्थापक अध्यक्ष कै. जनार्धन लहाने ( गुरुजी) यांच्या प्रतिमा पूजनाने कार्यक्रमाची सुरुवात झाली.

मान्यवरांचे स्वागत प्रत्यक्ष व संगीत गीताने करण्यात आल्यानंतर. वार्षिक स्नेहसंमेलन निमित्त दैनिक सकाळचे पत्रकार राजाभाऊ नगरकर मामा यांच्या अमृत महोत्सवी वर्षानिमित्त त्यांचा शाळा व संस्थेच्या वतीने विशेष सत्कार करण्यात आला.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक विद्यालयाचे मुख्याध्यापक श्री श्रीहरी गिते सर यांनी प्रस्ताविक करत असताना विद्यार्थ्यांनी शैक्षणिक प्रगती साधत असताना सर्वांगीण विकास होण्यासाठी प्रत्येक स्पर्धांमध्ये सहभागी व्हावे असे मत व्यक्त केले. प्रमुख पाहुण्यांनी आपले मनोगत व्यक्त करत असताना शाळेच्या प्रगतीबद्दल समाधान व्यक्त व्यक्त करून वार्षिक स्नेहसंमेलन निमित्त विद्यार्थ्यांना शुभेच्छा देण्यात आल्या. त्याचबरोबर क्रीडा विभागातर्फे प्रजासत्ताक दिनानिमित्त घेण्यात आलेल्या विविध क्रीडा स्पर्धेचे बक्षिस वितरणाचा कार्यक्रम घेण्यात आला. यानंतर विविध सांस्कृतिक कार्यक्रमांचे प्रत्यक्ष प्रात्यक्षिक दाखवत आनंदोत्सव साजरा करण्यात आला.

यामध्ये प्रामुख्याने ''जाणता राजा हे नाटक'', (मार्गदर्शक वाघमारे पांडुरंग सर, श्री अघाव सिद्धेश्वर सर)विविध चित्रपटातील गाणे, मुक अभिनय या बरोबर इंदोरीकर महाराज कॉमेडी या गीताने तर अक्षरशः प्रेक्षकांनी धुमाकूळ घातला. नंतर सुंदर ''फुगे घ्या फुगे'' या धमाल विनोदी गीतांचे सादरीकरण करण करण्यात आले.

या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन श्री. चौधरी शेषराव सर,श्रीमती प्रियंका वाव्हळे मॅडम यांनी केले तर हा कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी विद्यालयातील सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.

## जिंतूरात सकल मराठा समाजाचे ''बोंबमारो'' आंदोलन तहसीलदार मार्फत मुख्यमंत्र्यांना निवेदन

**रामप्रसाद कंठाळे**

**जिंतूर,/प्रतिनिधी-** जिंतूरात सकल मराठा समाजाचे ''बोंबमारो'' आंदोलन तहसीलदार मार्फत मुख्यमंत्र्यांना निवेदन

जिंतूर प्रतिनिधी- मागील पाच दिवसांपासून अंतरवाली सराटी येथे मनोज जारांगे पाटील यांच्यासह सकल मराठा समाजातील नागरिकांचे सुरू असलेल्या उपोषणाची राज्य सरकारने दखल घेतलेली नसल्याच्या निषेधार्थ सकल मराठा समाजाच्या वतीने दिनांक ३१ जानेवारी बोंबमारो आंदोलन करण्याचा इशारा निवेदनाद्वारे तहसीलदार यांच्या मार्फत मुख्यमंत्री यांना दिला आहे.




मराठा समाजाचा सरसगट ओबीसी प्रवर्गात समावेश करावा यासाठी २५ जानेवारी पासून अंतरवाली सराटी तालुका अंबड जिल्हा जालना येथे मराठा संघर्ष योद्धा मनोजदादा जरांगे पाटील यांच्या नेतृत्वाखाली हजारो तरुण,महिला वयोवृद्ध व्यक्ती आमरण उपोषणाला बसले आहेत परिणामी अनेक आंदोलकांची तब्यत दिवसेंदिवस खालावत चाललेली आहे असे असताना राज्य सरकारने यांच्याकडे लक्ष देत नाही त्यांना आरोग्याचा सुविधा अपुऱ्या पडत आहेत म्हणून मराठा समाजाच्या भावना तीव्र होत आहेत म्हणून आगामी काही दिवसात सकल मराठा समाजाच्या मागण्या मान्य करून तत्काळ उपोषण सोडवावे अन्यथा लोकशाही मार्गाने आंदोलन छेडण्याचा इशारा देण्यात आला असून याची सुरुवात बोंबमारो आंदोलन करून करणार असल्याचे निवेदन तहसीलदार यांच्या मार्फत मुख्यमंत्र्यांना देण्यात आले आहे या निवेदनावर सकल मराठा समाजातील नागरिकांच्या सह्या आहेत.



### अमरावतीचे खासदार वानखेडे यांचा सत्कार

**गंगाखेड,/प्रतिनिधी-** अमरावतीचे खासदार वानखेडे यांचा सत्कार गंगाखेड : अमरावतीचे खासदार बळवंत वानखेडे हे आज गंगाखेड शहरात आले असता तालुका व शहर कॉंग्रेस कमिटीच्या वतीने शहर कार्यालयात त्यांचे स्वागत व सत्कार करण्यात आला. याप्रसंगी रिपाईंचे नेते डॉ. सिद्धार्थ भालेराव कॉंग्रेस तालुकाध्यक्ष गोविंद यादव, शहराध्यक्ष शेख युनूस, जिल्हा ऊपाध्यक्ष ॲड. हनुमंत जाधव, युवक प्रदेश सचिव प्रणित खजे, अविनाश भोसले, बालाजी पवार, सय्यद खलीलभाई, शे. अजीम, ईनायतुल्ला पटेल, शेख जावेद, खाजाभाई गुत्तेदार, फारूक पटेल, मोहसीन भाई, सय्यद ईस्माईल आदिंची ऊपस्थिती होती.

## सांस्कृतिक कार्यक्रमांमुळे विद्यार्थ्यांच्या सुप्त कलागुणांना वाव - आ.डॉ.गुट्टे

### स्नेहसंमेलनात विद्यार्थ्यांच्या कलागुणांचे दर्शन

**पालम,/प्रतिनिधी-** शाळेमधून विद्यार्थ्यांना शैक्षणिक ज्ञान तर मिळतेच पण विविध सहशालेय उपक्रमातून विद्यार्थ्यांच्या अंगी असलेल्या सुप्त गुणांचा विकास होतो. यामधून उद्याचा शास्त्रज्ञ, अभिनेता, वक्ता, नेता, लोकप्रतिनिधी, संशोधक, अधिकारी, अभियंता आणि खेळाडू तयार होत असतात. त्यामुळे विद्यार्थ्यांनी वर्षभर शाळेत घेतल्या जाणाऱ्या विविध शालेय स्पर्धा व सहशालेय उपक्रमात सहभाग घेतला पाहिजे. परिणामी, विद्यार्थ्यांचे व्यक्तीमत्व सर्वगुण संपन्न बनते. शाळेत मिळालेले हे ज्ञान आयुष्यभर मार्गदर्शक ठरत असते, असे प्रतिपादन स्थानिक आमदार डॉ.रत्नाकर गुट्टे यांनी केले.

शहरातील कृष्णाई पब्लिक स्कूलमध्ये आयोजित वार्षिक स्नेहसंमेलन आणि भव्य नागरी सत्कार सोहळ्यात ते बोलत होते. याप्रसंगी त्यांनी शाळेतील मुलांचे कलागुण व कौशल्यांचे कौतुक केले. कार्यक्रमाचे औचित्य साधून सलग दोनवेळा विजयी झाल्याबद्दल आ.डॉ.गुट्टे आणि सहकारी आमदार राजेश विटेकर यांचाही शाळेच्या वतीने भव्य नागरी सत्कार करण्यात आला.

पुढे आ.डॉ.गुट्टे म्हणाले, ग्रामीण भागातील मुलांच्या शिक्षणात अनेक अडचणी येतात. तरीही प्रयत्न कधीही सोडू नका. हे स्पर्धेचे युग आहे. येथे टिकण्यासाठी खूप संघर्ष असतो आणि त्यात जो पाय घट्ट रोवून उभा राहतो तो जिंकतोच. म्हणून आयुष्यात मोठे होण्यासाठी खूप परिश्रम करा. मेहनत करा. कष्टानेच कोणत्याही क्षेत्रात यशस्वी होता येते. त्यामुळे आपली स्वप्ने साकार करण्यासाठी मनाशी जिद्द बाळगा. आपल्या आई-वडिलांना आणि गुरुजनांना कधीही विसरू नका. अभ्यास करा आणि यशस्वी व्हा.

राजेश विटेकर म्हणाले की, शाळा ही समाजाची प्रतिकृती आणि समाज परिवर्तनाचे साधन सुद्धा असते. शाळेतून भावी पिढी घडविण्याचे काम काम केले जाते. तसेच सर्व विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास साधण्याचे प्रयत्न केले जातात. त्या दृष्टीने ही शाळा सुध्दा प्रयत्नशील आहे, याचा आनंद वाटतो. गेल्या काही वर्षात शाळेची उत्तम कामगिरी राहिली आहे. त्यामुळे भविष्यात सुद्धा



विद्यार्थी हिताला प्राधान्य देवून शाळा नावलौकिक मिळवेल, असा विश्वास आहे.

यावेळी आमदार राजेश विटेकर, जिल्हा मध्यवर्ती बँकेचे संचालक गणेशराव दादा रोकडे, उपविभागीय अधिकारी जीवराज डापकर, मित्रमंडळाचे विधानसभा अध्यक्ष किशनराव भोसले, मा. जिल्हा परिषद सदस्य रत्नाकर शिंदे, पोलीस निरीक्षक सुरेश थोरात, गुट्टे काका मित्रमंडळाचे जिल्हाध्यक्ष संदीप आळनुरे, प्रभारी माधवराव गायकवाड,

बालासाहेब रोकडे, कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती गजानन रोकडे, स्थानिक नगरसेवक उबेद खान, माजी सभापती गणेशराव घोरपडे, कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक गणेश हत्तीअंबीरे, अतुल धुळगुंडे, माऊली घोरपडे, विजय घोरपडे यांच्यासह शाळेचे मुख्याध्यापक, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी व पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

